# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २५ जून, २०२६ / आषाढ ४, १९४८ (शके)**

**(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**
**(२) उच्च व तंत्र शिक्षण, संसदीय कार्य मंत्री**
**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**
**(४) शालेय शिक्षण मंत्री**
**(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री**
**(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री**
**(७) वस्त्रोद्योग मंत्री**
**(८) सहकार मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

### गडचिरोली जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील कंत्राटी शिक्षकांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत

**(१) * ८८८७ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम, नक्षलग्रस्त व अतिमागास असलेल्या पेसा क्षेत्रामध्ये नियमित शिक्षक भरती दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने मोठ्या प्रमाणात शिक्षक पदे रिक्त असल्यामुळे येथील जिल्हा परिषदांमार्फत शासन आदेशानुसार शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये टीइटी, सीटीइटी व टीएआयटी २०२२ उत्तीर्ण पात्रताधारक उमेदवारांची पेसा क्षेत्राकरीता कंत्राटी शिक्षक म्हणून भरती केली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पेसा क्षेत्रातील एकूण शिक्षक पदांपैकी ५० टक्के पदे संबंधित क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव ठेवून उर्वरित ५० टक्के पदे खुल्या प्रवर्गातून भरण्याची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नव्याने नियमित शिक्षक भरती प्रक्रिया राबविल्यास सध्या प्रत्यक्ष सेवा देत असलेल्या कंत्राटी शिक्षकांवर अन्याय होण्याची तसेच दुर्गम व नक्षलग्रस्त भागात सेवा बजावित असलेल्या पात्र उमेदवारांची सेवा समाप्त होण्याची शक्यता असल्यामुळे कंत्राटी शिक्षकांवर अन्याय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पेसा क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व सध्या कार्यरत कंत्राटी शिक्षकांच्या सेवासुरक्षेचा विचार करून खुल्या प्रवर्गातील ५० टक्के पदांमध्ये प्रथम प्राधान्याने कार्यरत कंत्राटी शिक्षकांना संधी देणे, उर्वरित पदे पवित्र पोर्टलमार्फत भरणे, संबंधितांना शिक्षणसेवक म्हणून समाविष्ट करून नियमित सेवेत सामावून घेणे तसेच त्यांची पूर्वीची कंत्राटी सेवा ग्राह्य धरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) पेसा क्षेत्रामधील आरक्षणाबाबतचे प्रकरण मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने व पुढील आदेशापर्यंत पदभरतीस स्थगिती असल्याने त्या क्षेत्रामध्ये नियमित पदभरती करता आली नाही. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासन पत्र, दिनांक १५/०७/२०२४ अन्वये सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२२ मधील एसटी-पेसा या वर्गवारीतील गुणवत्ताधारक शिक्षक व त्यानंतर इतर प्रवर्गातील शिक्षक या प्राधान्यक्रमानुसार मानधन तत्वावर तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत सूचित करण्यात आले होते.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १७/११/२०२५ रोजीच्या अंतरिम आदेशाच्या आधारे सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार पेसा क्षेत्रातील गावामध्ये जिथे अ.ज. प्रवर्गाची लोकसंख्या २५ ते ५० टक्के इतकी किंवा त्याहून अधिक आहे त्याठिकाणी ५० टक्के पदे अ.ज. प्रवर्गातील उमेदवारांमधून व उर्वरित ५० टक्के पदे अराखीव प्रवर्गातील उमेदवारांमधून भरावयाची आहेत. ज्या ठिकाणी अनुसूचित जमातीची लोकसंख्या २५ टक्क्यापेक्षा कमी आहे, अशा गावातील प्रत्येकी २५ टक्के पदे अ.ज. प्रवर्गातील उमेदवारांमधून व उर्वरित आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांमधून तर ५० टक्के पदे अराखीव उमेदवारांमधून भरावयाची आहेत.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११/०२/२०२६ रोजीचा शासन निर्णय व दिनांक ०४/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२२ मधील एसटी-पेसा या वर्गवारीतील जे गुणवत्ताधारक शिक्षक मानधन तत्वावर नियुक्त होते, त्यांना नियमित नियुक्ती देण्यात आली आहे. पेसा क्षेत्रात अन्य वर्गवारीतील जे उमेदवार कंत्राटी तत्वावर कार्यरत आहेत, त्यांची नियुक्ती नियमित उमेदवार मिळेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली असल्याने त्यांना नियमित नियुक्ती देता येणार नाही. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ मधील गुणांच्या आधारे पवित्र पोर्टलमार्फत निवड प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी अशा उमेदवारांना आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शहरी भागातील शाळांसाठी अंतराची अट शिथिल करून अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांना सेवा संरक्षण देण्याबाबत

**(२) * ९१११ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संचमान्यतेच्या दिनांक १५ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार इयत्ता नववी व दहावीच्या तुकड्यांमध्ये प्रत्येकी २० पेक्षा एकही विद्यार्थी कमी असल्यास त्या स्तरावरील तीनही शिक्षक अतिरिक्त ठरविले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक संघटनांच्या मागणीनंतर मा.मंत्री महोदयांच्या बैठकीमध्ये इयत्ता नववी व दहावी या दोन्ही तुकड्यांमध्ये मिळून किमान ४० विद्यार्थी संख्या असल्यास आणि संबंधित शाळेपासून तीन ते पाच किलोमीटर अंतरावर अन्य शाळा उपलब्ध नसल्यास त्या शाळेतील शिक्षकांना अतिरिक्त घोषित न करता सेवा संरक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरी भागातील अनेक शाळा एक ते दोन किलोमीटर अंतरावर असल्यामुळे सदर अंतराच्या अटीचा लाभ शहरी शाळांना मिळत नसून, इयत्ता नववी व दहावीमध्ये एकत्रित ४० विद्यार्थी संख्या पूर्ण असूनही संबंधित शिक्षक अतिरिक्त ठरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व शिक्षकांवरील अन्याय टाळण्यासाठी इयत्ता नववी व दहावीमध्ये एकत्रित ४० विद्यार्थी संख्या पूर्ण असल्यास शहर भागातील शाळांसाठी अंतराची अट शिथिल अथवा रद्द करून संबंधित शिक्षकांना सेवा संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ मधील तरतुदीनुसार ज्या माध्यमिक शाळांमध्ये गट ९-१० करीता शिक्षक अनुज्ञेय होतात अशा शाळेपासून ३-५ किलोमीटर परिसरात असणाऱ्या व त्या परिसरात माध्यमिक शाळांत इ.९ ते १० वीच्या गटाकरीता ० पदे मंजूर होणाऱ्या शाळांमध्ये इ.९-१० वी च्या गटामध्ये संचमान्यता वर्ष २०२५-२६ मध्ये दोन्ही वर्गाची एकत्रित पटसंख्या ४० असल्यास ३ शिक्षक अनुज्ञेय करण्याबाबत शासन पत्र दिनांक २४/०३/२०२६ अन्वये निर्देश देण्यात आले होते.
(३) व (४) शासन पत्र दिनांक ११/०५/२०२६ अन्वये उक्त दिनांक २४/०३/२०२६ च्या निर्देशांमध्ये बदल करुन शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ मधील निकषांच्या अनुषंगाने इयत्ता ९-१० वीच्या ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये म्हणून वर्ष २०२५-२६ ची संचमान्यता करताना दोन्ही वर्गांची एकत्रित पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास ३ शिक्षक अनुज्ञेय करण्याची सवलत देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अपंग समावेशित शिक्षण योजनेतील विशेष शिक्षकांच्या पात्रता पडताळणीबाबत

**(३) * ८७०२ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत कार्यरत असलेल्या १,३५८ विशेष शिक्षकांच्या पात्रता पडताळणी प्रक्रियेमध्ये केवळ ३५८ शिक्षकांनाच पात्र ठरविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष शिक्षकांच्या दीर्घ सेवाकाळाचा अनुभव, प्रत्यक्ष अध्यापन कार्य, तसेच त्यांनी संपादन केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतांचा पात्रता तपासणी प्रक्रियेत पुरेसा विचार करण्यात आला नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात विशेष शिक्षक अपात्र ठरण्याची शक्यता निर्माण झाली असून अनेक पदे रिक्त राहण्याबरोबरच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण व्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असून, शेकडो विशेष शिक्षकांवर बेरोजगारीचे संकट येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत कार्यरत असलेल्या विशेष शिक्षकांवरील बेरोजगारीचे संकट निवारण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत कार्यरत असलेल्या १,३५८ विशेष शिक्षकांना सुनावणीची वाजवी संधी देऊन युनिट मान्यता, वैयक्तिक मान्यता, किमान शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता असलेल्या ३५८ विशेष शिक्षकांना सुनावणी अंती पात्र ठरविण्यात आले आहे.
(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल रिट याचिका क्र. १३२/२०१६ मध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राज्यातील सद्य:स्थितीत उपलब्ध रिक्त शिक्षकीय पदांपैकी, प्रत्येक केंद्र स्तरावर १ याप्रमाणे ४,८६० पदे विशेष शिक्षकाच्या नियुक्तीकरीता राखून ठेवण्यास आणि राखून ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांवर कार्यरत २,९८४ विशेष शिक्षकांचे समायोजन करण्यास दिनांक ०८/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल अवमान याचिका क्र.२६४/२०१७ व संलग्न याचिका प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ०१/०७/२०२२ रोजीचे आदेशानुसार व नैसर्गिक न्याय तत्वानुसार सुनावणीचे अधिकार आयुक्त (शिक्षण) यांना देण्यात आले होते. त्यानुसार, विशेष शिक्षकांना सुनावणीची वाजवी संधी देऊन सुनावणीअंती पात्र / अपात्रतेचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत. अपात्र ठरलेल्या काही विशेष शिक्षकांनी मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठांत विविध याचिका दाखल केल्या असून काही याचिकांमध्ये अपात्रता आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती देण्यात आली आहे.

केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अंतर्गत समावेशित शिक्षण मधील २,५६४, अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर)(IEDSS) अंतर्गत पात्र ३४७ विशेष शिक्षक आणि अपंग एकात्म शिक्षण योजना (प्राथमिक स्तर)(IED) अंतर्गत माध्यमिक युनिटवरील ४९ विशेष शिक्षक अशा ३ योजनांमधील एकूण २,९६० कंत्राटी कार्यरत कर्मचारी जिल्हा परिषदांकडे समायोजनासाठी देण्यात आले आहेत. यापैकी २,८६५ कर्मचारी केंद्रस्तरीय विशेष शिक्षक पदावर समायोजित झालेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय शिक्षण विभागातील ई-ऑफिस प्रणाली अधिक प्रभावी करून प्रशासकीय कामे सुलभ व पारदर्शक करण्याबाबत

**(४) * ९६३६ श्री.सत्यजीत तांबे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागामार्फत शिक्षक व कर्मचाऱ्यांची प्रशासकीय कामे सुलभ, गतिमान व पारदर्शक करण्याच्या उद्देशाने ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असताना, प्रत्यक्षात ऑनलाईन प्रस्ताव सादर केल्यानंतरही विविध प्रस्तावांच्या मंजुरीस विलंब होत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित असूनही प्रस्तावांची हार्ड कॉपी सादर करणे, प्रत्यक्ष कार्यालयीन पाठपुरावा करणे तसेच वारंवार कार्यालयीन फेऱ्या मारणे भाग पडत असल्यामुळे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा व संस्थाचालकांना अनावश्यक मानसिक, आर्थिक व प्रशासकीय त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास डिजिटलायझेशनचे काम करताना अनेक तांत्रिक अडचणी असल्याने, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार प्रलंबित असून गेल्या १५ ते २० वर्षांपासून कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता आदेशांवरील जावक नंबर जुळत नाही किंवा अधिकाऱ्यांनी टाकलेले नाहीत यामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिक्षकांची मान्यता अनियमित ठरवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित कार्यालयांमध्ये प्रत्यक्ष भेट दिल्यानंतरच प्रस्तावांची पडताळणी केली जात असून विनाकारण त्रुटी काढून प्रस्ताव प्रलंबित ठेवले जात असल्यामुळे ई-ऑफिस प्रणालीचा मूळ उद्देश बाधित होत असून प्रशासकीय कामकाजात जाणीवपूर्वक दिरंगाई केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी न होणे, प्रस्ताव मंजुरी प्रक्रियेत होणारा विलंब तसेच अनावश्यक कार्यालयीन हस्तक्षेप करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच अनावश्यक हार्ड कॉपीची सक्ती व कार्यालयीन उपस्थिती टाळून, प्रत्येक प्रस्तावासाठी स्पष्ट चेकलिस्ट, निश्चित कालमर्यादा, ऑनलाईन ट्रॅकिंग प्रणाली लागू व जबाबदारी निश्चिती करून सर्व प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक, सुलभ व वेळेत पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

ई-ऑफिस मध्ये कामकाज करताना काही प्रकरणी मूळ सहीची कागदपत्रे, देयके मूळ सेवापुस्तके, साक्षांकित केलेली कागदपत्रे सादर करणे आवश्यक ठरते अशा प्रकरणी मूळ कागदपत्रे तपासूनच कार्यवाही करणे आवश्यक असते अशा बाबतीत प्रकरणपरत्वे मूळ कागदपत्रांची मागणी केली जाऊ शकते.

(३) डिजिटलायझेशच्या कामामध्ये तांत्रिक अडचणी नाहीत. वैयक्तीक मान्यता व शालार्थ आयडी प्रकरणांबाबत विहित कार्यपध्दतीनुसार कामकाज आवश्यक आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

ई-ऑफिस प्रणालीमुळे कामकाजात पारदर्शकता व गतिमानता निर्माण झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक अभिलेख व नस्ती यांचे जतन, सनियंत्रण व ट्रॅक ठेवणे अत्यंत सुकर व सुलभ झाले आहे.

तसेच संबंधित शिक्षणाधिकारी/विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडील प्रकरणात प्रचलित नियमातील तरतूदीनुसारच कार्यवाही केली जाते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित स्वच्छतागृहांची उभारणी करण्याबाबत

**(५) * ९७०६ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती भावना गवळी, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांपैकी एकूण २१ हजार ६४१ शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था नसल्याचे शिक्षण विभागाच्या अहवालानुसार माहे मे, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १,१६४ माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध नसून त्यामध्ये १,००३ शासकीय शाळांचा समावेश आहे, तसेच ३,३२८ शाळांमध्ये स्वच्छतागृहांसाठी पाण्याची सुविधा उपलब्ध नाही, अनेक ठिकाणी नियमित साफसफाईचा अभाव, तुटलेली दारे व असुरक्षित वातावरणामुळे मुलींना अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र व सुरक्षित स्वच्छतागृहे, विनामुल्य सॅनिटरी नॅपकिन सुविधा व स्वतंत्र प्रसाधनगृहे उपलब्ध करून देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेले असतानाही राज्यातील अनेक शाळांमध्ये या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र, सुरक्षित व सुसज्ज स्वच्छतागृहे उभारण्यासाठी शासनाने विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला असून ज्या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध नाही अशा शाळांमध्ये प्राधान्यक्रमाने कामे हाती घेण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सर्व शाळांमध्ये स्वच्छतागृह उभारणीबरोबरच त्यांची नियमित देखभाल, स्वच्छता, पाण्याची उपलब्धता, सुरक्षितता, सॅनिटरी नॅपकिन वितरण व स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती सुनिश्चित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२), (३), (४) व (५) युडायस डाटा सन २०२५-२६ नुसार राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत ९९.५९ टक्के, अनुदानित शाळेत ९९.८८ टक्के व विनाअनुदानित शाळेत ९९.७२ टक्के शाळांमध्ये मुलींचे स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध आहे.

तसेच युडायस डाटा सन २०२५-२६ नुसार राज्यातील सर्व व्यवस्थापनाच्या १०० टक्के शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे.

सर्व शाळांमध्ये समग्र शिक्षा तसेच इतर योजनांतून मुलींकरीता वापरण्यायोग्य स्वच्छतागृह उपलब्ध करण्याबाबत दिनांक ३०/१२/२०२५ व २१/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यस्तरावरून सूचना निर्गमित करण्यात आल्या आहे. स्वच्छता गृहांची कामे करण्याबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आले असून कामे प्रगती पथावर आहेत.

समग्र शिक्षा अंतर्गत शाळांच्या गरजेनुसार शाळा अनुदान उपलब्ध करण्यात येते. सदर अनुदानामधून प्राधान्याने स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधांचे किरकोळ दुरूस्ती करण्यात येते. तसेच सन २०२६-२७ मध्ये समग्र शिक्षा अंतर्गत सॅनिटरी नॅपकीन करीता निधी उपलब्ध करण्यासाठी भारत सरकारकडे प्रस्तावित करण्यात आले आहे.

जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सीएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग इत्यादी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांव्दारे कार्यान्वित उपाययोजनांचा शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील स्थानिक गरजानुसार अपेक्षित पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सुचना देण्यात आल्या आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या टी. वाय. बी. कॉम.च्या परिक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याबाबत

**(६) * ८७७४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, अ‍ॅड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, अ‍ॅड.अनिल परब :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या टी.वाय.बी.कॉम. (सत्र-६) परीक्षेमधील इकॉनॉमिक्स, कॉमर्स तसेच डायरेक्ट ॲण्ड इंडायरेक्ट टॅक्सेस पेपर-२ या तीन विषयांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याची गंभीर बाब माहे एप्रिल, २०२६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांद्रा येथील आर.डी. नॅशनल कॉलेजमध्ये विद्यापीठाच्या भरारी पथकाने सहा विद्यार्थ्यांना मोबाईल फोनसह पकडल्यानंतर सदर प्रश्नपत्रिका फुटीचे प्रकरण समोर आले असून, पश्चिम उपनगरातील काही खासगी क्लासेसच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर संबंधित प्रश्नपत्रिका व त्यांची उत्तरे परीक्षा सुरू होण्यापूर्वी प्रसारित करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात विद्यापीठ प्रशासनाकडून संबंधित विद्यार्थ्यांचे मोबाईल जप्त करण्यात आले असले तरीही प्रकरणाच्या गांभीर्याच्या तुलनेत पोलिसांकडे गुन्हा नोंदविण्यास विलंब झाल्याची तसेच प्रश्नपत्रिका फुटीमध्ये संघटीत रॅकेट, खासगी क्लासेस अथवा परीक्षा व्यवस्थापनाशी संबंधित व्यक्तींचा सहभाग असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाची उच्चस्तरीय समिती, विशेष तपास पथक (SIT) अथवा सायबर तज्ज्ञांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येऊन पेपरफुटी प्रकरणातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने नेमलेल्या चौकशी समितीने केलेल्या चौकशीनुसार दोषींवर नियमानुसार आवश्यक प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील सहभागी असलेल्या ३ कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या आहेत.

तसेच दोषी विद्यार्थ्यांवर विद्यापीठाच्या अवैध साधन समितीच्या निर्णयानुसार त्यांचा निकाल निरंक लावणे, पुढील दोन परीक्षेला बसू न देणे आणि दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बांद्रा येथील बळीराम हिरे आर्किटेक्चर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना बोगस विद्यापीठांचे प्रमाणपत्र दिल्याबाबत

**(७) * ८७८५ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील, श्री.योगेश टिळेकर, श्री.राजहंस सिंह, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध अनधिकृत संस्था व बोगस अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची दिशाभूल करून शैक्षणिक व आर्थिक फसवणूक होत असल्याच्या घटनांची दखल घेऊन अशा संस्थांविरुध्द तातडीने फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वांद्रे (मुंबई) येथील बळीराम हिरे आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या संस्थाचालक व प्राचार्यांनी उच्च शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आर्थिक व शैक्षणिक फसवणूक करुन मान्यता नसलेल्या विद्यापीठांची बोगस प्रमाणपत्रे वितरित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या अधिकृत मान्यता नसताना BVoc/BSc Interior Design या पदवी अभ्यासक्रमाची नावाचा वापर करुन विद्यार्थ्यांचे प्रवेश करुन घेतले तसेच अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना संगाई युनिव्हर्सिटी, सिक्कीम, ग्लोबल इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, हिमालयीन युनिव्हर्सिटी व सिक्कीम इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी या नावाने बारकोड व क्यूआर कोड नसलेल्या गुणपत्रिका (Marksheet) व प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना वितरित केली आहेत, तसेच या सर्व संबंधित विद्यापीठांना विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व सिक्कीम शासनाकडून निर्बंध घालण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई येथील बळीराम हिरे आर्किटेक्चर महाविद्यालयाच्या संस्थाचालक व प्राचार्यांनी उच्च शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आर्थिक, शैक्षणिक व भविष्यातील रोजगार संधींची फसवणूक करुन बोगस विद्यापीठांची प्रमाणपत्रे देणाऱ्या महाविद्यालय, संस्थाचालक व प्राचार्यांवर कोणती कारवाई केली तसेच फसवणूक झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित करण्यासाठी शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, गुणपत्रिका वितरीत केलेल्या आहेत.
(३) होय, खरे आहे.
(४) महाराष्ट्र राज्य कृषी, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अधिनियम, २०१३ अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून संचालक, तंत्र शिक्षण यांनी अनधिकृत संस्था व अभ्यासक्रम तात्काळ बंद करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांचा शुल्क परतावा व संबंधित संस्थाचालक व प्राचार्य यांचेवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश दिनांक २७/०५/२०२६ रोजी पारीत केलेले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने इयत्ता ८ वी च्या पाठयपुस्तकातील मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा वगळल्याबाबत

**(८) * ८८४४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत प्रकाशित करण्यात आलेल्या इयत्ता आठवीच्या इंग्रजी विषयाच्या पाठ्यपुस्तकाच्या नव्या आवृत्तीत पूर्वी समाविष्ट असलेला मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा तसेच छत्रपती शिवाजी महाराज व मराठा साम्राज्याशी संबंधित काही ऐतिहासिक संदर्भ वगळण्यात आले असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजस्थानमधील काही राजघराणे, इतिहास अभ्यासक अथवा इतर घटकांनी सदर नकाशातील ऐतिहासिक अचूकतेबाबत आक्षेप नोंदविल्यानंतरच एनसीईआरटीकडून हा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बदलांमुळे राज्यातील शिवप्रेमी, इतिहास अभ्यासक, विविध सामाजिक संघटना, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून मराठा इतिहासाचे शालेय अभ्यासक्रमातील महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे तसेच सातारा येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा व आंदोलन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, मराठा साम्राज्याचा इतिहास व त्याचा भौगोलिक विस्तार याबाबत विद्यार्थ्यांना अचूक व सविस्तर माहिती मिळावी यासाठी इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकात मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा व संबंधित ऐतिहासिक माहिती पूर्ववत समाविष्ट करण्यात यावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासन, केंद्रीय शिक्षण मंत्रालय तसेच राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्याकडे कोणता पत्रव्यवहार अथवा पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (NCERT) जुलै, २०२५ मध्ये प्रकाशित केलेल्या इयत्ता ८ वी च्या सामाजिक शास्त्र विषयाच्या इंग्रजी आवृत्तीच्या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक ७१ वर मराठा साम्राज्याचा विस्तार हा नकाशा देण्यात आलेला होता.तथापि, इयत्ता ८ वी च्या सामाजिक शास्त्र विषयाच्या हिंदी व उर्दू माध्यमाच्या पुस्तकातून तो वगळण्यात आल्याचे दिसून आले. तसेच, मार्च, २०२६ मध्ये पुनर्मुद्रित केलेल्या इयत्ता ८ वी च्या सामाजिक शास्त्र विषयाच्या इंग्रजी आवृत्तीच्या प्रतीत सदरील नकाशा वगळण्यात आल्याचे दिसून आले आहे.
(२) सदर बाबतची कार्यवाही राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली कार्यालयाच्या संबंधित विभागामार्फत करण्यात आली असल्याने याबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तपशील राज्य शासनाकडे उपलब्ध नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) शासनाच्या दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांना अधिक माहितीचा समावेश करण्याबाबतचे अंतिम साहित्य पाठविण्यात आलेले असून या माहितीचा समावेश करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. यामध्ये, मराठा साम्राजाचा पाया, शिवाजी महाराजांचा उदय, जन्म, बालपणीचे शिक्षण, स्वराज्य स्थापनेची सुरुवात, गनिमी कावा, किल्ले जिंकणे, विविध शत्रूचा बंदोबस्त, विविध स्वाऱ्या व लढाया, राज्याभिषेक, तसेच छत्रपती शिवाजी महाराजानंतरचा मराठ्यांचा इतिहास यांचा समावेश करण्यात आलेला आहे. व त्या अनुषंगाने शासनामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरळवाडी व दाभोळवाडी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आदिवासी बांधवांनी शाळांच्या प्रलंबित प्रश्नांकरीता आंदोलन केल्याबाबत

**(९) * ९५९६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरळवाडी व दाभोळवाडी (ता.पनवेल, जि.रायगड) येथील आदिवासी बांधवांनी शाळांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पंचायत समिती, पनवेल येथे उपोषण आंदोलन केले असल्याचे माहे

एप्रिल, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरळवाडी येथील पहिली ते चौथीपर्यंतची प्राथमिक शाळा बंद करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, दुर्गम व डोंगराळ भागातील लहान विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दूर अंतरावर जावे लागत असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्यामुळे सदर शाळा पुन्हा सुरु करण्याची मागणी स्थानिक नागरिक, पालक व आदिवासी बांधवांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, शिक्षणाचा मूलभूत हक्क व दुर्गम भागातील शैक्षणिक सुविधा लक्षात घेता शासनाने कोरळवाडी येथील प्राथमिक शाळा पुन्हा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच, यासाठी आवश्यक शिक्षक, सेविका व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे. रायगड जिल्हा परिषद शाळा, कोरळवाडी ह्या २००५ पासून सुरू असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे सन २०१८ मध्ये पटसंख्या कमी झाल्यामुळे रायगड जिल्हा परिषद शाळा, तारा या सुमारे ३ कि.मी. अंतरावर असलेल्या शाळेत समायोजन करण्यात आले होते. सदर तारा येथील शाळेत इ.१ ली ते इ.४ थी चे ३६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. २० विद्यार्थ्यांच्या पालकांनी कोरळवाडी येथील शाळेत प्रवेश घेण्याबाबत संमती दर्शविली आहे. त्यानुसार कोरळवाडी शाळा सन २०२६-२७ मध्ये पुन्हा सुरू करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. कोरळवाडी येथील शाळेची इमारत नादुरूस्त असून, सदर इमारतीची दुरूस्ती पंचायत समिती सेस अंतर्गत करण्यात येणार आहे. तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा, दाभोळवाडी ही शाळा सुरू असून सदर शाळेचा युडायस क्र.२७२४०८१४७०६ असा आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात १६४ अनधिकृत शाळा सुरु असल्याबाबत

**(१०) * ९४४४ श्री.सचिन अहिर, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अरुण लाड, श्री.राजहंस सिंह, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोणत्याही भागात नवीन अनधिकृत शाळा सुरू झाल्यास संबंधित शिक्षणाधिकारी यांना वैयक्तीककरित्या जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा शासन निर्णय माहे डिसेंबर, २०२३ मध्ये निर्गमित करूनही त्याची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई शहरात सुमारे १६४ अनधिकृत शाळा कार्यरत असून त्यामध्ये इंग्रजी माध्यमाच्या सर्वाधिक १४५ शाळा असून त्यापैकी देवनार आणि मानखुर्द परिसरात ६५, मालाडमध्ये २५, तर कांदिवली आणि कुर्ला भागात प्रत्येकी १२ शाळा स्थित असल्याचे निदर्शनास आले असून, या अनधिकृत शाळांची विभागनिहाय, माध्यमनिहाय व परिसरनिहाय सविस्तर माहिती काय आहे, तसेच सदर अनधिकृत

शाळांपैकी बहुतांश शाळा या अनेक वर्षांपासून सुरु असून दरवर्षी त्यांची "अनधिकृत शाळा" म्हणून नोंद होत असतानाही संबंधित शाळा अद्याप बंद करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण हक्क कायद्याच्या (RTE) कलम १८ (१) व (५) नुसार मान्यतेशिवाय शाळा सुरु करणे बेकायदेशीर असतानाही, प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अशा शाळा दीर्घकाळ सुरू राहिल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे तसेच या अनधिकृत शाळांपैकी सुमारे ४८ शाळांनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये कागदपत्रांची पूर्तता करून मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर प्रलंबित असून अनधिकृत शाळांमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर, शैक्षणिक मानकांवर तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेवर प्रतिकूल परिणाम होत असल्याबाबत शासनाने अभ्यास अथवा सर्वेक्षण केले आहे काय,
(४) असल्यास, माहे डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयानुसार कडक अंमलबजावणी करण्यात अपयशी ठरलेल्या संबंधित शिक्षणाधिकारी व इतर जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती शिस्तभंगात्मक अथवा प्रशासकीय कारवाई केली तसेच अशा अनधिकृत शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी त्यांचे पुनर्वसन, मान्यताप्राप्त शाळांमध्ये प्रवेश, मोफत शिक्षणाची व्यवस्था तसेच पालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) व (३) अंशतः खरे आहे.

मुंबई शहर व उपनगरातील १६४ अनधिकृत शाळांची यादी शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून घोषित केली असून त्यापैकी १४५ शाळा इंग्रजी माध्यमाच्या आहेत. तसेच, एम/ पूर्व विभागात ६५, पी/उत्तर विभागात २५, आर/दक्षिण विभागात १२ व एल विभागात १२ शाळा अनधिकृत आहेत. सदर १६४ अनधिकृत शाळा बंद करणेबाबत दिनांक २२/०२/२०२६ रोजी नोटीस देण्यात आली आहे.

तसेच, सदर अनधिकृत शाळांबाबतची यादी/ माहिती दिनांक १७/०४/२०२६ रोजी ५ स्थानिक वृत्तपत्रात व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या www.mcgm.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. तसेच, सदर अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी आपल्या पाल्याचे प्रवेश घेऊ नयेत असे आवाहन करण्यात आले आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील बालकांना शिक्षण देण्याची जबाबदारी शासन व स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. बृहन्मुंबई परिक्षेत्रातील देवनार, मानखुर्द, मालाड तर कांदवली आणि कुर्ला या भागात झोपडपट्टी असून हे भाग दाटीवाटीचे आहेत. या भागात पालिकेच्या शाळा संपूर्ण क्षमतेने दोन शिफ्टमध्ये चालविण्यात येत असल्यामुळे अनधिकृत शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यात अडचणी येत आहेत.

बृहन्मुंबई परिक्षेत्रातील १६४ अनधिकृत शाळांपैकी ज्या शाळांमध्ये शासन मान्यताप्राप्त माध्यमिकचे वर्ग सुरू आहेत, अशा ४८ शाळांचे प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शासनास प्राप्त झाले असून सदर प्रस्तावांवर कार्यवाही सुरू आहे.

(४) शासन निर्णय दिनांक १८/१२/२०२३ अन्वये, जिल्ह्यात नव्याने अनधिकृत शाळा सुरू झाल्यास संबंधित शिक्षणाधिकारी यांचेवर व्यक्तिगत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे

सन २०२२-२३ मध्ये बृहन्मुंबई परिक्षेत्रात एकूण २१० आढळून आलेल्या होत्या. तदनंतर, नव्याने अनधिकृत शाळा सुरू झालेली नसून अनधिकृत शाळांची संख्या कमी होत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील हजारो शाळांची स्वयंमूल्यांकन प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत

**(११) * ८९४५ श्री.श्रीकांत भारतीय, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.प्रसाद लाड, श्री.संजय भेंडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांची गुणवत्ता उंचावण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्यातंर्गत शाळांना स्वयंमूल्यांकन बंधनकारक करण्यात आले असून, सदर स्वयंमूल्यांकन प्रक्रिया दिनांक १६ मार्च ते १५ एप्रिल, २०२६ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून एकूण १ लाख ८ हजार ९२ शाळांपैकी केवळ ४९ हजार ८४४ शाळांनीच स्वयंमूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली असून सुमारे ५८ हजार २४८ शाळांचे शैक्षणिक व भौतिक गुणवत्ता मूल्यांकन अद्याप प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शाळांमध्ये तांत्रिक अडचणी, इंटरनेट सुविधेचा अभाव, शिक्षक व मुख्याध्यापकांवरील वाढलेला प्रशासकीय कामाचा ताण तसेच आवश्यक प्रशिक्षणाच्या अभावामुळे स्वयंमूल्यांकन प्रक्रिया प्रलंबित राहिल्याने संबंधित शाळांना दिनांक १ मे, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वयंमूल्यांकन प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेवर, शाळांच्या विकास आराखड्यावर व शिक्षणाच्या एकूण गुणवत्ता सुधारणा मोहिमेवर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व शाळांचे गुणवत्ता मूल्यांकन निश्चित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी तसेच मुदतवाढ देऊनही स्वयंमूल्यांकन प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या संबंधित अधिकारी व शाळा प्रशासनाविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे..सन २०२५-२६ मधील शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा (SQAAF) प्रक्रिया दिनांक १६/०३/२०२६ ते १५/०४/२०२६ मध्ये राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. दिनांक १६ मार्च ते १५ एप्रिल, २०२६ पर्यंत एकूण १ लाख ८ हजार ९२ शाळांपैकी ४९ हजार ८४४ शाळांनी स्वयंमूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली आहे. ५८,२४८ शाळांचे शैक्षणिक व भौतिक गुणवत्ता मूल्यांकन पूर्ण करण्यासाठी प्रथम टप्प्यात दिनांक १ मे, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तद्नंतर ११४५२ शाळांचे स्वयंमूल्याकन अपूर्ण होते. या शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी दिनांक १५ मे, २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच तांत्रिक अडचणी

आलेल्या शाळांसाठी ३ दिवस वाढवून दिनांक १८ मे, २०२६ रोजी स्वयंमूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. दिनांक १८ मे, २०२६ रोजी एकूण १०५९५६ (९८.१५%) शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) वाढीव कालावधी देऊनही स्वयं मूल्पमापन पूर्ण न केलेल्या एकूण २०९६ शाळांना खुलासा सादर करण्याबाबत संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण महाराष्ट्र, पुणे यांनी कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळद खरेदी प्रक्रिया सुलभ करुन शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) * ९१९९ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीची मोठ्या प्रमाणावर आवक होत असताना वजन काट्यांची संख्या अपुरी असल्याने तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे हळद खरेदी प्रक्रियेस ४ ते ५ दिवसांचा विलंब होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विलंबामुळे कडाक्याच्या उन्हामध्ये शेतकऱ्यांना बाजार समिती परिसरात थांबावे लागत असून, हळदीच्या मालाची सुरक्षितता, गुणवत्ता व बाजारमुल्यावर प्रतिकूल परिणाम होत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मानसिक व आर्थिक मनस्ताप सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माजी संचालक मंडळाने जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून वजन काट्यांची संख्या वाढविणे, अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, खरेदी प्रक्रिया सुलभ करणे व शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात विविध मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हळद उत्पादक शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी, खरेदी प्रक्रियेला गती देण्यासाठी, हमीभाव मिळवून देण्यासाठी तसेच बाजार समितीमध्ये आवश्यक सुविधा, अतिरिक्त वजन काटे, मनुष्यबळ व साठवण व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

वजन काटयाची संख्या ही वार्षिक उलाढालीवर अवलंबून असते. शेतमाल हळदीची मोठ्या प्रमाणात आवक ही एप्रिल व मे या दोन महिन्यात येत असते. बाजार समिती हिंगोली यांच्याकडे एकूण २८ अनुज्ञप्तीधारक मापारी/तोलारी असून बाजार समिती हिंगोली यांच्याकडे लहान-मोठे असे एकूण ४० इलेक्ट्रॉनिक्स वजन काटे असून त्यावर २८ अनुज्ञप्तीधारक मापारी/तोलारी प्रत्यक्ष काम करतात.

(२) हे खरे नाही.

बाजार समिती हिंगोली यांच्याकडे शेतकऱ्यांच्या मुक्कामासाठी हॉल असून त्यात थंड वाऱ्यासाठी डेजर्ट कुलरची व्यवस्था असून लाईट, फॅन, तसेच, थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या मालाचे संरक्षण करणेसाठी सी.सी.टी.व्ही. सुविधा, सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मानसिक व आर्थिक मनस्ताप सहन करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे नाही.

अशा प्रकारची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अभिलेख नोंदवही वरुन सकृत दर्शनी प्राप्त झाल्याची निदर्शनास येत नाही.

(४) प्रशासक मंडळाने कृषी उत्पन्न बाजार समिती, हिंगोली आवारात शेतकऱ्यांना ताडपत्री देणे, सी.सी.टी.व्ही. सुविधा, शेतकरी भवनात वॉटर कुलर व्यवस्था, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मैदानात गाड्यांसाठी व्यवस्था, ओट्यावर ताडपत्री लावणे या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बहुतांश अनुदानित महाविद्यालयांनी राष्ट्रीय मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याबाबत

**(१३) * ९०७२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व अनुदानित महाविद्यालयांनी राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषद (NAAC) मार्फत मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असतानाही, अद्याप अनेक महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जिल्हानिहाय अनुदानित महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून, नॅक मूल्यांकन प्रक्रिया अपूर्ण असलेल्या महाविद्यालयांची जिल्हानिहाय संख्यादेखील मोठ्या प्रमाणात असून उक्त प्रक्रिया अद्यापही पूर्ण झाली नसल्याने महाविद्यालयांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी राज्यातील अनुदानित महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन निश्चित कालमर्यादेत तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यातील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील १२३२ अनुदानित महाविद्यालयांपैकी १२०३ महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन प्रक्रिया पूर्ण केलेली आहे.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (६) व ११० (४) मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व सार्वजनिक विद्यापीठांना कळविण्यात आले आहे. तसेच दिनांक २९/०८/२०२३ रोजी झालेल्या महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण आयोगाच्या बैठकीमध्ये यासंदर्भात सार्वजनिक विद्यापीठांना निर्देश देण्यात आले आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परामर्श योजनेच्या धर्तीवर राज्यातील महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक १९ एप्रिल, २०२३ अन्वये राज्यात परीस-स्पर्श योजना सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध संस्थांनी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत बनावट प्रशिक्षणार्थी दाखवून आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१४) * ९२४१ श्री.संजय खोडके, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.पंकज भुजबळ, श्री.अरुण लाड, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्याचे कंत्राट घेणाऱ्या काही संस्थांनी प्रत्यक्ष अस्तित्वात नसतानाही बनावट कागदपत्रांच्या आधारे महाराष्ट्रासह देशपातळीवर कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याची बाब दिनांक २५ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विविध संस्थांच्या माध्यमातून सुमारे ६७,१५४ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले मात्र उमेदवारांचे आधार क्रमांक आणि चुकीचे बँक खाते दिल्यामुळे या संस्थांनी खोटे विद्यार्थी दाखवून कोट्यावधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असून, प्रशिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या पात्रता व निकषाचे उल्लंघन करुन त्यापैकी काही संस्थांनी कार्यालयात कुठलेही यंत्र नसताना वीजतंत्री व नळकामगार अशा सुमारे ५२ हजार उमेदवारांना प्रमाणपत्र देऊन पात्र ठरविण्यात आले असल्याचेही भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक (CAG) यांनी सादर केलेल्या अहवालात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संस्थांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे खोटे विद्यार्थी दाखवून शासनाच्या कोट्यावधी निधीचा गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली तसेच महालेखापरिक्षक (कॅग) यांनी सुचविल्यानुसार संबंधित संस्थांकडून वसुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही. केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत (PMKVY) देशभरात काही संस्थांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे आर्थिक घोटाळा केल्याबाबत २५ एप्रिल, २०२६ ची किंवा त्या सुमारासची कोणतीही अधिकृततक्रार अथवा थेट अहवाल या विभागाच्या स्तरावर प्राप्त झालेला नाही. तथापि, सदर योजना ही केंद्र शासनाची असून, यामध्ये देशभरातील संस्थांचे मूल्यमापन थेट केंद्रीय स्तरावर केले जाते.
(२) हे खरे नाही.भारताचे नियंत्रक व महालेखा परीक्षक (CAG) यांचा अहवाल हा केंद्रीय स्तरावरील म्हणजेच केंद्र शासनाच्या ‘कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या (MSDE)’ संपूर्ण देशातील कामगिरीशी संबंधित आहे.सदर कॅग (CAG) अहवालातील आक्षेप आणि त्रुटी या प्रामुख्याने राष्ट्रीय

स्तरावरील अंमलबजावणी यंत्रणा, आधार प्रमाणीकरण मधील त्रुटी आणि विविध राज्यांमधील सामायिक निरीक्षणांशी) संबंधित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एम.आय.ए.उर्दू प्राथमिक शाळा, खेड यांना अनुदान मंजुरी नाकारुन अपात्र यादीत समाविष्ट केल्याबाबत

**(१५) * ९२८३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.आय.ए. उर्दू प्राथमिक शाळा, खेड ही भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांक संस्थेद्वारे चालविण्यात येणारी शाळा असून सदर शाळेस माहे जून, २००३ पासून मान्यता प्रदान करण्यात आली असून, शिक्षण हक्क कायदा, २००९ लागू झाल्यानंतर व "कायम विनाअनुदानित" हा शब्दप्रयोग वगळण्यात आल्यानंतर संबंधित शाळेने दिनांक १० मे, २०१२ रोजी अनुदानासाठी ऑनलाईन अर्ज सादर केला असता स्वयंमूल्यमापन प्रक्रियेमध्ये संबंधित शाळेला ८२ गुण प्राप्त झाले होते व त्यानंतर शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी व छायाचित्रण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सुमारे सहा महिन्यांनंतर जिल्हा मूल्यांकन समितीच्या निर्देशानुसार पुनर्मूल्यांकन करण्यात आले असता शाळेला ७८ गुण कायम ठेवण्यात आले होते तरीही शिक्षण विभागाच्या विविध कार्यालयांशी सातत्याने पत्रव्यवहार करूनही आजपर्यंत सदर शाळेस अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शाळा एकदाही अपात्र घोषित करण्यात आलेली नसतानाही चुकीच्या माहितीच्या आधारे दिनांक ०१/०४/२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील क्रमांक २०५ वर सदर शाळेचे नाव अपात्र यादीत समाविष्ट करण्यात आले असून त्यामुळे इयत्ता १ ली ते ४ थी मधील वय वर्षे ६ ते ९ या लहान मुलींच्या शिक्षणावर परिणाम होऊन त्यांना शैक्षणिक लाभांपासून वंचित राहावे लागत आहे, तसेच कोकण विभागातील अनेक शाळांचे अनुदान प्रस्ताव अद्याप प्रलंबित असतानाही अशा अनेक शाळांना अपात्र घोषित करण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शसनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित शाळेला न्याय मिळवून देण्यासाठी, अपात्रतेचा फेरविचार करण्यासाठी व प्रलंबित अनुदान मंजूर करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

एम.आय.ए. उर्दू प्राथमिक शाळा, खेड या शाळेस स्वयंमूल्यमापनात ८२ गुण मिळाले आहेत. तथापि, जिल्हास्तरीय शाळा मूल्यांकन समितीने केलेल्या मूल्यांकनात अंतिम एकूण ६२ गुण मिळाले आहेत.

(२) हे खरे नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक १५/११/२०११ अन्वये, अनुदान मूल्यांकनाचे निकष विहीत करण्यात आले आहेत. त्यानुसार शाळा गुणवत्ता या बाबीसाठी ५० गुणांपैकी किमान ३७.५० गुण मिळणे अनिवार्य आहे. तथापि, सन २०१२ मधील जिल्हास्तरीय शाळा मूल्यांकनात सदर शाळेस शैक्षणिक गुणवत्ता या बाबीसाठी ३६ गुण प्राप्त झाले असल्याने जिल्हास्तरीय मूल्यांकनात सदर शाळा अपात्र ठरली आहे. तसेच, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या दिनांक ०६/१२/२०१८ रोजीच्या पत्रानुसार मूल्यांकन समितीमार्फत केलेल्या मूल्यांकनात विनापरवानगी शाळा स्थलांतर, शाळेस प्रथम मान्यता घेतलेली नसणे व इ. २ री ते ४ थीच्या वर्गास नैसर्गिक वाढीने मान्यता नसल्याने सदर शाळा अपात्र ठरली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चौकशी प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(१६) * ९३३४ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गैरव्यवहारांचे अनेक गंभीर प्रकार समोर आले असून, या प्रकरणात बोगस परवाने, बेकायदा गाळे वाटप, मोकळ्या जागांचा (उदा. G-५६) गैरवापर आणि पार्किंगच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट झाल्याचे माहे एप्रिल, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीतील जी-५६ क्रमांकाच्या जागा मागील अधिवेशनादरम्यान बंद करण्यात आल्या होत्या, मात्र अधिवेशन समाप्त होताच त्या पुन्हा सुरू करण्यात आल्या असून जी-५६ प्रकरणाची सखोल चौकशी होऊन दोषींवर कारवाई होणे अपेक्षित असताना चौकशी प्रक्रियेत अनियमितता झाल्याचे आरोप होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भुसार बाजार परिसरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्याबाबत संबंधित प्राधिकरणांनी आदेश निर्गमित केले असूनही प्रत्यक्षात कारवाई करण्यात आलेली नाही तसेच बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या गैरकारभार, आर्थिक अनियमितता व प्रशासकीय त्रुटींबाबतची व गैरव्यवहारांची यादीच जाहीर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नियुक्त चौकशी प्रक्रियेत अनियमितता करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच सदर गैरव्यवहारांमधील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे या बाजार समितीबाबत विविध तक्रारी पणन संचालक कार्यालयास प्राप्त झालेल्या होत्या, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत सदर जागेचा वापर लगतचा गाळाधारक जादाचा शेतमाल ठेवण्याकरीता करत आहे. व्यापारी जागेचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास व्यापाऱ्यांवर बाजार समितीकडून सातत्याने कारवाई केली जाते. सदर जागा वापराबाबतचे निकष ठरविण्यासंदर्भात बाजार समितीचे संचालक मंडळाच्या सभेमध्ये निर्णय घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

भुसार बाजारातील व्यापाऱ्यांनी त्यांना दिलेल्या भूखंडामधील जागेतच बांधकाम केले असून बाजार समितीचे जागेत अतिक्रमण केलेले नाही. भूखंडाचे जागेत सोडलेल्या साईडमार्जीन व रियरमार्जीनच्या कंपाउंडच्या भिंतीची उंची वाढवून पत्रे टाकून सदरच्या जागा बंदिस्त केल्या आहेत व सदरचे बांधकाम हे अनाधिकृत बांधकाम आहे, अशा अनधिकृत बांधकामावर कार्यवाही केली असता त्याविरुध्द व्यापाऱ्यांनी प्राप्त करुन घेतलेले स्थगिती आदेश उठविण्यात येऊन, तदनंतर सदर भुखंडाचे समोरील ओट्याची बांधकामे काढण्यात आलेली आहेत.

(४) याबाबत पणन संचालक कार्यालयाच्या दिनांक १४/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४०(अ) व नियम ११७ अन्वये चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना प्राधिकृत करण्यात आले होते. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग यांनी चौकशी करुन दिनांक २५/०२/२०२६ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये मोकळया जागा जी-५६ वापराबाबत जी- ५६ या मुद्दयाची चौकशी करण्यात आलेली आहे. जी-५६ जागापैकी १५ जागा ८ आडत्यांना भाड्याने तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आल्या होत्या. बाजार समितीने दिनांक ०८.०१२.२०२५ रोजी नोटीस काढून सदर वाटप रद्द केलेले आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील नियम ११७ अन्वये पणन संचालक कार्यालयात सदर अहवालावर कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे व संबंधित अर्जदार यांची सुनावणी प्रक्रिया पूर्ण झालेली आहे व पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील कौशल्य विकास विद्यापीठाचे उपकेंद्र कार्यान्वित करण्याबाबत

**(१७)** * **८६८४ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व महसुली विभागांमध्ये कुशल मनुष्यबळ व उद्योजक निर्माण व्हावेत या हेतूने सन २०२२ मध्ये 'महाराष्ट्र कौशल्य विकास विद्यापीठा'ची स्थापना करण्यात आली असून मुंबई येथे मुख्य कॅम्पस व नाशिक, नागपूर, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथे प्रादेशिक उपकेंद्रे स्थापन करण्याची घोषणा शासनाने केली असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घोषणेस चार वर्षांहून अधिक कालावधी होवूनही छत्रपती संभाजीनगर येथील उपकेंद्र अद्याप कार्यान्वित करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानव विकास निर्देशांकानुसार छत्रपती संभाजीनगर वगळता मराठवाड्यातील अन्य सात जिल्हे देशाच्या यादीत तळाला असून काही भागांची औद्योगिक भरभराट झाली असली तरी कुशल

मनुष्यबळाच्या अभावामुळे स्थानिक युवकांना रोजगारापासून वंचित राहावे लागत असल्याने मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर येथे कौशल्य विकास विद्यापीठाचे उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील कौशल्य विकास विद्यापीठाचे उपकेंद्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ अधिनियम, २०२१ नुसार रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यापीठाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे सुरू असून विद्यापीठाने पुणे व नागपूर येथे उपकेंद्रे कार्यान्वित केली आहेत.
नाशिक व छ. संभाजी नगर येथे केंद्र प्रस्तावित असून छत्रपती संभाजी नगर येथे उपकेंद्र सुरू करण्याकरीता जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील महाविद्यालयात व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी बनावट जात वैधता प्रमाणपत्राचा वापर केल्याबाबत

**(१८) * ९१६९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड टेक्नॉलॉजीमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील बनावट जात वैधता प्रमाणपत्रांचा वापर करण्यात आले असल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील पाचगाव पोलीस ठाण्यात एका सहाय्यक प्राध्यापकासह एकूण ११ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले असून, विद्यार्थ्यांकडून बनावट जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी प्रत्येकी दोन लाख रुपयांपर्यंतची बेकायदेशीर रक्कम वसूल आली असून बनावट जात वैधता प्रमाणपत्रांच्या आधारे व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळाल्यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या घटनात्मक हक्काच्या प्रवेशापासून वंचित राहावे लागत असल्याने त्यांच्यावर अन्याय होत असून नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूरसह पुणे व गडचिरोली जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची नावेही समोर आली असून, राज्यातील व्यावसायिक प्रवेश प्रक्रियेमध्ये बनावट जात वैधता प्रमाणपत्रे तयार करून पुरविणारे संघटीत रॅकेट कार्यरत असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले चौकशीच्या अनुषंगाने गोविंदराव वंजारी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅण्ड टेक्नॉलॉजीमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गातील बनावट जात वैधता प्रमाणपत्रांचा

वापर करुन व्यावसायिक अभ्यासक्रमांचा प्रवेश देणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील पाचगांव पोलीस ठाण्यात ०२ सहाय्यक प्राध्यापकांसह एकूण ११ जणांविरुध्द अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांच्याकडून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) व (४) सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, अभियांत्रिकी या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे जमात वैधता प्रमाणपत्र आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना त्यांच्या विनंतीनुसार राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने उपलब्ध करुन दिले.त्यातील ३२ उमेदवारांची जमात वैधता प्रमाणपत्रे बोगस असल्याचे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या निदर्शनास आणले. नैसर्गिक न्यायाच्या तत्वास अनुसरुन संबंधित उमेदवार, पालक आणि संस्था यांची बाजू ऐकून घेऊन, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने सदर प्रकरण प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २५/०२/२०२६ रोजीच्या बैठकीत सादर केले.

महाराष्ट्र व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेशाचे विनियमन) आणि विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (शुल्काचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदीनुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ०९/०४/२०२६ रोजीच्या बैठकीत ३२ उमेदवारांचे अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र बोगस असल्यामुळे, त्यांचे प्रवेश रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरीता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) * ८६६७ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यातील जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिका शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य केले असतानाही तसेच पालघर जिल्ह्यातील सुमारे २ हजार ११२ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य केले असताना ही केवळ २५१ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविले असून १ हजार ८५३ शाळांमध्ये सीसीटिव्ही बसविण्याचे काम अद्यापपर्यंत निधी अभावी अपूर्ण असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या निर्णयानुसार जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिका शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समिती (DPC) निधीमधून पाच टक्के निधी राखीव ठेवण्यास शासनाने परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक ग्रामीण व दुर्गम भागातील शाळांमध्ये निधीअभावी अद्याप सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम अपूर्ण असून हजारो शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याने आवश्यक अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची मागणी विविध स्तरावरुन केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत राज्यातील सर्व शाळांमध्ये तातडीने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे शासन निर्णय दिनांक १३ मे २०२५ नुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपायायोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयानुसार शाळा व परिसरात सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबतचा मुद्दा नमूद करण्यात आला आहे.

शासनाने दिनांक १३/०५/२०२२ व दिनांक १६/०४/२०२५ च्या शासन निर्णयान्वये निधीबाबत सविस्तर सूचना निर्गमित केलेल्या आहेत. याबाबत लागणाऱ्या निधीसाठी-खनिज निधी, विधीमंडळ व संसद सदस्य निधी, जिल्हा परिषदेमधील विकास कामाचे विविध निधी वापरता येऊ शकतात. निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व संबंधित अन्य अधिकारी यांना यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात आले असून यासाठीच्या निधीसाठी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व संबंधित अन्य अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शासनाचे दिनांक १३ मे २०२५ चे शासन निर्णयातील निर्देशानुसार, संचालनालयाकडून अधिनस्त सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक २१/०५/२०२५, २५/०६/२०२५, ११/०७/२०२५, १०/११/२०२५ व २८/११/२०२५ च्या पत्रान्वये, याअनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून दिनांक २७ व २८/०६/२०२५ रोजी सर्व विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली असून यामध्ये याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

संकेतस्थळावर नोंदविलेल्या शाळांच्या संख्यात्मक माहितीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जिल्हा परिषद /नगरपालिका /नगरपरिषद /कटकमंडळे) एकूण ६४,४७७ शाळांपैकी २१,११४ शाळांनी, खाजगी व्यवस्थापनाच्या एकूण ४०,५१३ शाळांपैकी ३७,७०३ शाळांनी तसेच, इतर व्यवस्थापनाच्या एकूण ३,८४३ शाळांपैकी ३,७६५ शाळांमध्ये महत्वाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असल्याची नोंद केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये हवामान बदलाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ई-लर्निंग उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(२०) * ९५१९ श्रीमती भावना गवळी, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये हवामान बदलाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत ‘केंब्रिज क्लायमेट क्वेस्ट’ हा ई-लर्निंग उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपक्रम राबविण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या माध्यमातून ‘केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस ॲण्ड असेसमेंट इंडिया’ यांच्यासोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व शाळांमध्ये हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे तसेच या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये हवामान साक्षरता, पर्यावरणीय जबाबदारी व शाश्वत विकासाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच सदर उपक्रम प्रभावीपणे राबविताना ग्रामीण व शासकीय शाळांमध्ये आवश्यक तांत्रिक सुविधा, इंटरनेट उपलब्धता व शिक्षक प्रशिक्षण याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) “Cambridge Climate Quest” हा ई-लर्निंग कार्यक्रम विद्यार्थ्यांना मोबाईल/लॅपटॉप/संगणक कोणत्याही साधनावर लॉगीन करून कोर्स पूर्ण करता येणार आहे. यासाठी शाळा स्तरावर उपलब्ध संगणक सुविधांचा वापर करण्यात येत आहे.तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत शाळास्तरावर लॉगीन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर उपक्रम Cambridge Quest ॲपच्या सहाय्याने घेण्यात येत आहे. त्यामुळे पालकांच्या मोबाईलवर देखील हा कोर्स पूर्ण करता येत आहे. प्रत्येक जिल्ह्यातून दोन नोडल अधिकारी व शाळा स्तरावर मुख्याध्यापक/शाळा स्तरावरील समन्वयक यांना सदर उपक्रमाबाबत ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माळगाव (ता.भडगाव, जि.जळगाव) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या जीर्ण झालेल्या वर्गखोल्यांचे बांधकाम करणेबाबत

**(२१) * ९५५४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळगाव (ता.भडगाव, जि.जळगाव) येथील जिल्हा परिषदेच्या १३१ प्राथमिक शाळेच्या वर्गखोल्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून इमारत मोडकळीस आल्याने तेथील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण झाला असून विद्यार्थ्यांना असुरक्षित वातावरणात शिक्षण घ्यावे लागत असल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०२६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित जिल्हा परिषद शाळेस नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामास प्रशासकीय मंजुरी देणे, आवश्यक निधी उपलब्ध करून देणे व विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) सद्य:स्थितीत मळगाव ता.भडगाव शाळेची पटसंख्या २१ असून सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१२-१३ मध्ये दोन वर्गखोल्या व एक मुख्याध्यापक कक्ष असे बांधकाम पूर्ण केले आहे. त्या वर्गखोल्यांची स्थिती विद्यार्थ्यांना बसण्यास योग्य आहे. विद्यार्थ्यांची पटसंख्या विचारात घेता नविन वर्गखोल्यांची कोणतीही आवश्यकता नाही.

तसेच शाळेच्या आवारात असलेल्या इतर दोन जीर्ण खोल्यांचे निर्लेखन प्रस्तावास गटविकास अधिकारी पं.स. भडगाव यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिले असून लवकरच निर्लेखन केले जाणार आहे.

जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सीएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग इत्यादी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांव्दारे कार्यान्वित उपाययोजनांचा शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील स्थानिक गरजानुसार अपेक्षित पायाभूत सुविधांच्या विकासाकरीता दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार सुचना देण्यात आल्या आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण आयुक्तालयाकडून लोकप्रतिनिधींच्या पत्रांकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याबाबत

**(२२)** * **९००३ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शिक्षक मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी यांनी सन २०२५-२६ या कालावधीत शिक्षण विभागाशी संबंधित विविध प्रश्न, शिक्षकांच्या समस्या, प्रलंबित प्रशासकीय विषय व धोरणात्मक बाबी संदर्भात शिक्षण आयुक्त कार्यालयास एकूण १४ पत्रे पाठविल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर १४ पत्रांपैकी किती पत्रांना शिक्षण आयुक्तालयामार्फत निर्धारित कालावधीत उत्तर देण्यात आले आहे तसेच किती पत्रे अद्याप अनुत्तरित आहेत,
(३) असल्यास, लोकप्रतिनिधींना वेळेत उत्तर न देणे, त्यांच्या पत्रव्यवहाराची दखल न घेणे तसेच बैठकीच्या विनंत्यांकडे दुर्लक्ष करणे ही बाब प्रशासकीय उत्तरदायित्वाच्या दृष्टीने गंभीर असून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर १४ पत्रांतील विषयांच्या अनुषंगाने बैठका घेण्यात येऊन त्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधीतांना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीमधील आरक्षित जमीन खाजगी विकासकाला दिल्याबाबत

**(२३) * ८९२३ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहराच्या मध्यवर्ती भागातील सुमारे ४० एकर क्षेत्रावर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्र.११० अन्वये बाजार समितीसाठी राखीव जागेवर भाजीपाला मार्केट, कांदा-बटाटा मार्केट, फळ मार्केट व अन्नधान्य इमारतींचे बांधकाम करून व्यावसायिक वापर सुरू करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरक्षणातील सर्व्हे क्र. २८८, १८८/१, २९७/१, २९९/१, ३००, ३०१, ३०२/१ व ३०२/२ या भूखंडांबाबत तहसिलदार यांनी फेरफार नोंद क्र.०२२ दिनांक १०/०४/१९८९ अन्वये कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण यांच्या नावे नोंद केल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर फेरफार नोंदीनुसार संबंधित ७/१२ उताऱ्यावर कृषी उत्पन्न बाजार समितीचे नाव नोंदविणे बंधनकारक असताना तत्कालीन सचिवांनी जाणीवपूर्वक त्याची नोंद कृषी उत्पन्न बाजार समितीचे नावे न केल्याचे तसेच सर्व्हे नं.२९०/२ हा भूखंड समितीच्या नावे आरक्षित असतानाही शासनाची पूर्वपरवानगी न घेता सदर भूखंड संबंधित खासगी व्यक्तींना ना-हरकत दाखला (NOC) दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित आरक्षित भूखंडांबाबत शासनाच्या अथवा पणन संचालकांच्या आवश्यक परवानग्या न घेता तत्कालीन सचिव व इतरांनी परस्पर निर्णय घेत शासन मालकीच्या जमिनींचे व्यवहार करून सुमारे २०० कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने पणन संचालकांची पूर्वपरवानगी न घेता तसेच शासनाची दिशाभूल करून स्वतःच्या आर्थिक हितासाठी भ्रष्टाचार व अनियमितता करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच तत्कालीन सचिव यांनी त्यांच्या कार्यकाळात दिलेल्या परवानग्या, ना-हरकत दाखले व जमीन व्यवहारांची सखोल चौकशी करून नियमबाह्यरित्या देण्यात आलेले ना-हरकत दाखले तात्काळ रद्द करणे, संबंधित भूखंड शासनाच्या ताब्यात घेणेबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीने भाजीपाला, कांदा बटाटा, फळे मार्केटचे सन २००२ ते २००९ या कालावधीत बांधकाम पूर्ण करुन सन २००९-२०१० मध्ये बाजार आवार कार्यान्वित करण्यात आला आहे.

(२) सर्व्हे क्रमांक १८८/१ हा बाजार समितीच्या नावे नसून, इतर सर्व्हे क्रमांकाची जागा, क्षेत्र हे बाजार समितीच्या नांवे आहे.

(३) हे खरे नाही.

सर्व्हे क्रमांक २९०/२ हे क्षेत्र बाजार समितीच्या नांवावर नाही. या सर्व्हे क्रमांकाचे ६५०० चौ.मीटर संपादीत करण्याची प्रक्रिया सुरु केली असताना मा.कल्याण दिवाणी न्यायालयात पक्षकारांमध्ये तडजोड होऊन लँड रेफरन्स ५५/११ दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी हुकुमनामा (consent decree) पास करुन न्यायालयीन वाद संपुष्टात आला

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद् भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पूर्वमान्यता न घेता महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क वसुली केल्याबाबत

**(२४) * ८७२५ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची पूर्वमान्यता न घेता महाविद्यालयांनी सन २०२०-२०२१, २०२१-२०२२ व २०२४ व २०२५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांकडून विविध कारणांसाठी अनधिकृतपणे शुल्क वसूल केले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे संबंधित विद्यार्थ्यांची बाजू ग्राह्य धरून अतिरिक्त शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांना वसूल केलेले शुल्क सहा टक्के व्याजासह परत करण्याचे निर्देश मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी त्याचदरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने संबंधित महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून ज्या दिनांकास शुल्क आकारण्यात आले त्या दिनांकापासून सहा टक्के व्याजदराने संबंधित विद्यार्थ्यांना रक्कम परत करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची पूर्वमान्यता न घेता सन २०२०-२०२१, २०२१-२०२२ व २०२४ व २०२५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपणे अतिरिक्त शुल्क वसुल करणाऱ्या महाविद्यालयांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थ्यांची आर्थिक फसवणूक पुन्हा होऊ नये यासाठी शुल्क नियंत्रण व पारदर्शकतेसंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित बाबींची चौकशी करण्याकरीता दिनांक १०/०३/२०२६ रोजीच्या आदेशान्वये सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात

आलेले अतिरिक्त शुल्क सहा टक्के व्याजासह परत करण्याबाबत समितीने शिफारस केलेली आहे.

चौकशी समितीच्या शिफारशी व मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) उच्च शिक्षण संचालनालयामार्फत दिनांक १३/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांना प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, विकास शुल्क, प्रयोगशाळा शुल्क तसेच इतर शुल्कांची संपूर्ण माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर, सूचना फलकावर व प्रवेश माहिती पुस्तिकेत प्रसिध्द करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच शुल्क नियामक प्राधिकरण व विद्यापीठाच्या नियमांनुसार शुल्क आकारणीबाबत पारदर्शकता राखण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांनी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानास अल्प प्रतिसाद दिल्याबाबत

**(२५) * ८९२० श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या निर्देशानुसार "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचा" तिसरा टप्पा राज्यातील शाळांसाठी राबविण्यात येत असून या अभियानांतर्गत तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरील विजेत्या शाळांसाठी सुमारे ७२ कोटी रुपयांची रोख बक्षिसे जाहीर करण्यात आली असतानाही राज्यातील अनेक शाळांनी अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात अल्प प्रतिसाद दिल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील जवळपास ५,०३० शाळांकडून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात तसेच आवश्यक माहिती पोर्टलवर भरण्यात उदासीनता दाखविण्यात आल्यामुळे अभियानाच्या मुल्यांकन प्रक्रियेवर परिणाम होत असून संबंधित यंत्रणांवर ताण येत असल्याचे त्याचदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांमध्ये स्पर्धात्मक, प्रेरणादायी व आरोग्यदायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचा अभियानाचा मूळ उद्देश प्रभावीपणे साध्य करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय, दिनांक १६/१०/२०२५ अन्वये "मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा" अभियान सन २०२५-२६ (टप्पा-३) अंतर्गत एकूण १,०८,११६ शाळांपैकी १,००,४०५ शाळांनी - म्हणजेच ९२.८६ टक्के शाळांनी सहभाग नोंदविलेला आहे. - सन २०२४-२५ मध्ये ९८ हजार शाळांनी सहभाग नोंदविलेला होता.त्यामुळे तुलनेने सन २०२५-२६ मध्ये शाळांनी उत्सफूर्तपणे सहभाग घेतलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

शिक्षण आयुक्तालय यांच्या दिनांक २८/११/२०२५ रोजीच्या पत्रान्वये निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार शाळांना माहिती भरुन अंतिम करण्यासाठी दिनांक १९/१२/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, शाळांच्या मागणीनुसार या अभियानात जास्तीत जास्त संख्येने शाळांचा सहभाग वाढविण्यासाठी दोन वेळा मुदतवाढ देऊन दिनांक ०७/०१/२०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानुसार सदर तारखेपर्यंत शाळांची भरलेली माहिती अंतिम समजून त्यानुसार मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत सर्व मूल्यांकन प्रक्रिया सुरळितपणे पूर्ण करण्यात आलेली आहे.

(३) अभियान कालावधीत शाळांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्यासाठी शाळांचे मुख्याध्यापक यांचे भ्रमणध्वनीवर वेळोवेळी एसएमएसव्दारे विहित मुदतीपूर्वी माहिती अंतिम करुन सहभाग नोंदविण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच राज्यस्तरावरुन, विभागस्तरावरुन, जिल्हास्तरावरुन विविध बैठकांव्दारे क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी शाळांना अभियानात सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहित देण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून या अभियानाचा उद्देश, शाळांच्या भौतिक सुविधेमध्ये व विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये त्याचा होणारा सकारात्मक परिणाम, याचे महत्व संबंधित संस्था/शाळास्तरापर्यंत पोहचवून त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी वेळोवेळी शाळांचे उदबोधन करण्यात आले आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक प्रसिध्दीद्वारे शाळांना सहभाग नोंदविण्यासाठी जनजागृती व प्रसिध्दी मोहिम राबविण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध पुरवणी देयके प्रलंबित असलेबाबत

**(२६) * ८९८८ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध कारणांमुळे देय असलेली थकीत पुरवणी देयके शिक्षणाधिकारी, वेतन पथक अधीक्षक व शिक्षण उपसंचालक यांच्या हलगर्जीपणा व प्रशासकीय त्रुटींमुळे तसेच संचालक स्तरावरील लॉगिनवर मंजुरी (Approval) न मिळाल्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित पुरवणी देयकांची एकूण संख्या व रक्कम किती आहे, संबंधित देयके संचालकांच्या लॉगिनवर किती कालावधीपासून प्रलंबित आहेत, तसेच अशा पुरवणी प्रलंबित देयकांना मंजुरी न देण्यामागील तांत्रिक/प्रशासकीय कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुरवणी देयके दीर्घकाळ प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच सदर थकीत देयके तात्काळ अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

i.सन २०२५-२६ मध्ये नाशिक विभागातून प्राथमिक विभागाची एकूण ३८८० थकित देयके (रुपये ४२,७१,०६,५३५/-) संचालनालय स्तरावर प्राप्त झाली होती. त्यापैकी ९५६ देयके (रुपये १५,५४,४९,४१२/-) अमान्य करण्यात आलेली असून १९३२ थकीत देयके (रुपये १४,१६,७८,८८४/-) मान्य झाली असून उर्वरीत ९९२ देयकांवर कार्यवाही सुरू आहे.

ii.सन २०२५-२०२६ मध्ये नाशिक विभागातून माध्यमिक विभागाची एकूण ५५४१ थकीत देयके (रुपये १,२१,५२,९०,९९५/-) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्तरावर प्राप्त झाली होती. त्यापैकी ४४३ देयके (रुपये २,४०,७२,०२६/-) अमान्य करण्यात आलेली असून ३५१५ देयके (रुपये १५,९३,७०,०८३/-) मान्य करण्यात आलेली आहेत. उर्वरीत १५८३ देयकांवर संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(२) व (३) प्रलंबित देयके बहुतांशी न्यायलयीन प्रकरणे असून या प्रकरणांची प्रकरणनिहाय मूळ प्रत शिक्षण संचालनालयास ऊशिराने दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी व त्यानंतर माहे एप्रिल मध्ये प्राप्त झाल्यामुळे या देयकावर दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत कार्यवाही करता आलेली नाही. तथापी सदरील दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी संचालनालय स्तरावर प्रलंबित देयके निकाली काढण्याकरीता अर्थिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये थकीत देयक मंजुरीचे कामकाज दिनांक १२/०५/२०२६ पासून सुरु करण्यात आलेले असून संचालनालय स्तरावर प्रलंबित असलेल्या देयकांना मंजुरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पवित्र पोर्टलवर विषय निवड करताना अभियांत्रिकी पदवीधारकांना अडचणी येत असल्याबाबत

**(२७) * ९८८१ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या ‘पवित्र पोर्टल’द्वारे राबविण्यात येणाऱ्या शिक्षक भरती प्रक्रियेत B.E/B.Tech या अभियांत्रिकी पदवीधारकांना तसेच B.Ed (Science/Mathematics) पदवीधारक उमेदवारांना विषय निवड व पात्रता संदर्भात अडचणी येत असल्याबाबतचे लेखी निवेदन मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ मे,२०२६ रोजी वा त्यासुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) पवित्र पोर्टलवरील विषय निवड पर्यायांमध्ये काही अभियांत्रिकी शाखांचा स्पष्ट उल्लेख नसल्याने संबंधित उमेदवारांना अन्य इंजिनिअरिंग शाखा निवडावी लागत असल्याने ते या प्रक्रियेतून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, B.E/B.Tech व B.Ed (Science/Mathematics) पात्र उमेदवारांना शिक्षक भरती प्रक्रियेत न्याय मिळावा यासाठी विविध अभियांत्रिकी शाखांचा स्वतंत्र समावेश करणे, विषय निवडीचे पर्याय अधिक स्पष्ट करणे व सर्व इंजिनिअरिंग शाखा निवडीची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) इयत्ता ६ वी ते १० वी करीता गणित या विषयाच्या शिक्षक पदासाठी अभियांत्रिकीच्या काही शाखांमधील पदवी धारकांना पात्र ठरविण्यात आले आहे. अभियांत्रिकीच्या उर्वरित शाखामधील पदवीधारकांना देखील पात्र ठरविण्यात यावे अशा आशयाची मा.लोकप्रतिनिधींची निवेदने शासनास वेळोवेळी प्राप्त होतात.

(२) व (३) इयत्ता ६ वी ते १० वी करीता गणित या विषयाच्या शिक्षक पदासाठी अभियांत्रिकीच्या सर्व शाखामधील पदवीधारकांना पात्र ठरविण्याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, महाराष्ट्र, पुणे यांनी शिफारस केली असून शासन स्तरावरुन त्याबाबत यथोचित निर्णय घेण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँकेच्या कामकाजात सुधारणा करून सभासदांचे हित संवर्धनाबाबत

**(२८) * ९९४७ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटीव्ह बँक लि. ही राज्यातील मोठ्या पगारदार कर्मचारी सहकारी बँकांपैकी एक असून, माहे मे, २०२६ अखेर बँकेचे खेळते भांडवल रुपये २,४८० कोटी असून माहे मे, २०२६ पर्यंत त्यात ३१ कोटी ८४ लाख रुपये ठेवींमध्ये वाढ झाली असून बँकेचे एकूण सभासद संख्या ६० हजार २३४ एवढी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्याने स्थापना झालेल्या संचालक मंडळाने बँकेतील आर्थिक अनियमितता व भ्रष्टाचार प्रकरणांतील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच दिव्यांग सभासदांना कर्जावरील व्याजदरात १ टक्का सवलत देण्याचा प्रस्ताव भारतीय रिझर्व्ह बँकेकडे/सक्षम प्राधिकरणाकडे पाठविणे, मध्यम मुदतीच्या कर्जाची मर्यादा रुपये १५ लाखांपर्यंत वाढविणे व मध्यम मुदत तसेच तातडीच्या कर्जांचे वितरण पूर्ण क्षमतेने करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयांच्या अंमलबजावणीबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली असून त्याची सद्य:स्थिती काय आहे तसेच बँकेच्या कामकाजात सुधारणा करून सभासदांचे हित संवर्धनाबाबत व बँकेकडे अधिक सभासद व ठेवीदार आकर्षित करण्यासाठी नाविन्यपूर्ण बचत, कर्ज अथवा गुंतवणूक योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

विदयमान संचालक मंडळाने बँकेच्या आर्थिक व्यवहारासंदर्भात फॉरेन्सिक व डिटेल ऑडिट क्लॅरिफिकेशन अंतर्गत तपासणी सुरु असल्याचे तसेच बँकेच्या काही अधिकारी व कर्मचारी यांच्यावर बडतर्फ व निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच दिव्यांग सभासदांना कर्जावरील व्याजदरात ०.५० टक्का सवलत देण्याबाबत व सवलतीच्या दराने कर्जपुरवठा करण्याचे नियोजित केले आहे. मध्यम मुदतीच्या कर्जाची मर्यादा रुपये १२ लाख असून तातडीच्या कर्जाची मर्यादा ५ लाख आहे.

(३) इतर बँकेच्या तुलनेत ठेवीवरील व्याज दर ८.७५% असून व बचत व्याज दर ३ % करण्यात आला आहे. बँक सभासदांच्या ठेव व कर्ज पुरवठा यामध्ये प्रगती करण्याच्या दृष्टीकोनातून सभासद / ठेवीदारांच्या पातळीवर संवाद साधणे व भेटी गाठी घेणे तसेच संबंधित शाखा व्यवस्थापकांनी उद्दिष्ट निश्चित करुन देण्यात आले आहे. तसेच बँकेच्या कामकाजात प्रभावी सुधारणा होणेसाठी बँक व्यवस्थापनास वसुली, CASA ठेवी वाढ, इतर उत्पन्न वाढीबाबत उपाय योजना, कलम ९१, १०१, सरफेसी कायदयांतर्गत वसुली व AMI, CIBIL, SERSAI अंमलबजावणी या विषयाबाबत पाठपुरावा करण्यासाठी बँकेवर जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर यांच्या दिनांक २०/०६/२०२५ च्या आदेशान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई यांची पालक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील नदीजोड प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२९) * १०३६२ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत, श्री.सत्यजीत तांबे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करणे, त्यांचे संवर्धन व पुनरुज्जीवन करणे तसेच दुष्काळग्रस्त व अवर्षणप्रवण भागांना दीर्घकालीन जलसुरक्षा उपलब्ध करून देण्यासाठी नदीजोड प्रकल्प राबविण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असून कोकण-गोदावरी, दमणगंगा-वैतरणा-गोदावरी व दमणगंगा-एकदरे-गोदावरी हे राज्यासाठी महत्त्वाचे नदीजोड प्रकल्प असून त्यांच्या विविध टप्प्यांवरील तांत्रिक, प्रशासकीय व वैधानिक प्रक्रिया सुरू असून, सदर प्रक्रियांमुळे काही कामे संथ गतीने सुरु असल्याने अहिल्यानगर जिल्ह्यासह उर्ध्व गोदावरी उपखोऱ्यातील दुष्काळग्रस्त भागांना हक्काच्या पाण्यासाठी अद्याप प्रतिक्षा करावी लागत असल्याची बाब माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत प्रस्तावित उधळे व मेट धरणांची संयुक्त मोजणी पूर्ण करण्यात आलेली आहे, तसेच कोशीमशेत, निलमाती व बोरखिंड धरणांबाबत संयुक्त मोजणी, क्षेत्रिय सर्वेक्षण व इतर आवश्यक प्रक्रिया सुरू असून त्यास केवळ प्रशासकीय दिरंगाईमुळेच विलंब होत आहे, तसेच गोदावरीसह राज्यातील प्रमुख नद्यांच्या प्रदूषण नियंत्रण, संवर्धन व पुनरुज्जीवनासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व स्वयंसेवी संघटनांच्या सहभागातून विविध जनजागृती व लोकसहभाग तसेच गोदा ते नर्मदा जलयात्रा यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दमणगंगा आणि वैतरणा उपखोऱ्यातील (विशेषत: पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातून) अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविल्यास अहिल्यानगर, नाशिक (सिन्नर तालुका) व मराठवाड्यातील अवर्षणप्रवण भागांना सिंचनाचा, दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरला घरगुती व औद्योगिक पाण्याचा मोठा लाभ मिळणार असतानाही, संथ कामांमुळे शासकीय निधीचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असून, सदर प्रलंबित नदीजोड प्रकल्पांमुळे अहिल्यानगर व लगतच्या जिल्ह्यांतील जिरायती भागात सिंचनक्षमता वाढविण्याचे व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याचे शासनाचे उद्दिष्ट वेळेत साध्य न झाल्याने प्रशासकीय कार्यपध्दतीचे उल्लंघन होत आहे आणि शेतकरी व नागरिकांमध्ये तीव्र

असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गोदावरी नदी बारमाही प्रवाहित ठेवण्यासाठी आगामी कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर नदी स्वच्छ, निर्मळ व प्रदूषणमुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कामे, प्रकल्प व योजना मंजूर केल्या आहेत तसेच सदरपैकी किती कामांना निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे व प्रत्यक्षात मंजूर करण्यात आलेल्या कामांपैकी किती कामे सुरू करण्यात आली आहेत व त्यांची सद्य:स्थिती काय आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय साधून अहिल्यानगर जिल्ह्याला लाभ देणाऱ्या या नदीजोड प्रकल्पांची व प्रलंबित धरणांच्या मोजणीची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी तसेच नदीजोड प्रकल्प, नदी पुनरुज्जीवन कार्यक्रम, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नदी संवर्धन उपक्रम व जलसंधारण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून दुष्काळ निवारण तसेच राज्यातील पाणी उपलब्धतेची दीर्घकालीन शाश्वती निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशतः खरे आहे.

राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करणे, नद्यांचे संवर्धन व पुनरुज्जीवन करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाची स्थापना शा.नि.दिनांक २७/०४/२०२६ नुसार केली आहे.

पश्चिम वाश्चिनी नदीखोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी तूटीच्या खोऱ्यात वळविणेच्या अनुषंगाने नदीजोड प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे.

कोकण-गोदावरी नदीजोड प्रकल्प यामध्ये प्रामुख्याने अंतर्भूत असून पश्चिम वाहिनी कोकण खोऱ्यातील उल्हास व वैतरणा खोऱ्यातील ७८ टीएमसी अतिरिक्त पाणी नाशिक, अहिल्यानगर व मराठवाड्यात वळविणेबाबत योजनेचा प्राथमिक अन्वेषण अहवाल तयार करण्यात आला आहे. शासन पत्र दिनांक २९/०४/२०२६ अन्वये पूर्व संभाव्यता अहवालास सक्षम स्तरावरून मान्यता देणे बाबत निर्देश दिले आहेत. सद्य:स्थितीत प्रकल्पाचा सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाअंती सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड योजनेच्या रुपये २२१३.५३ कोटी किमतीच्या व दमणगंगा-वैतरणा- गोदावरी नदीजोड योजनेचा रुपये १३४९७.२४ कोटी किमतीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास शासन निर्णय दिनांक १४/१०/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सध्यस्थितीत प्रकल्पासाठी वनजमीन प्राप्त करुन घेणे, खाजगी जमिनींचे भुसंपादन करणे तसेच पर्यावरण मान्यतेबाबतची कार्यवाही चालू आहे. तसेच समांतररित्या प्रकल्पाच्या विविध उपांगाच्या संकल्पनाचे काम प्रगतिपथावर आहे. सदर कार्यवाही होताच निविदा काढण्याचे नियोजन केले आहे.
(२) हे खरे नाही.

निलमाती, मेट, कोशीमशेत, उधळे या धरणासाठी आवश्यक भूसंपादन कार्यवाही प्रगतीपथावर असून या भूसंपादनाकरीता दिनांक ०१/०४/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, पालघर यांना रुपये १० कोटी अदा करण्यात आली आहे. निलमाती, उधळे व मेट धरणांची संयुक्त मोजणी पूर्ण झालेली आहे.

दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड योजना, ता.पेठ, जि.नाशिक या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या विरोधामुळे काही गावातील संयुक्त मोजणीची कार्यवाही स्थगित करण्यात आलेली आहे. परंतु काही गावे

जसे मौजा निरगुडे येथे विरोध नसल्याने या गावातील संयुक्त मोजणीची कार्यवाही प्रगतीत आहे. शेतकऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या उचित मागण्या विचारात घेऊन सदर संयुक्त मोजणी सुरु करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवडा-२०२६ दिनांक १५/०४/२०२६ ते ३०/०४/२०२६ रोजी आयोजित करण्यात आला. सदर पंधरवड्याअंतर्गत शेतकऱ्यांमध्ये पाणी विषयक जनजागृती, गोदावरी नदीसह राज्यातील प्रमुख नद्यांच्या प्रदूषण नियंत्रण, संवर्धन व पुनरुज्जीवनासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था व स्वयंसेवी संघटनांच्या सहभागातून विविध जनजागृती करण्यात आली. त्र्यंबकेश्वर येथील पवित्र जल व चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या पदस्पर्शाने पावन माती घेऊन यात्रेस दिनांक २५/०४/२०२६ रोजी प्रारंभ करण्यात आला व सुमारे १००० वारकरी/शेतकरी यांना घेऊन यात्रेचा महेश्वरपर्यंत प्रवास संपन्न झाला. या यात्रेचा शुभारंभ राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.देवेन्द्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते तर महेश्वर येथील घाटावर दिनांक २९/०४/२०२६ रोजी समारोप कार्यक्रम मध्यप्रदेश राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.मोहन यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यात्रेच्या निमित्ताने पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कार्याचा प्रसार व जल विषयक जागृती करण्यात आली.

(३) हे खरे नाही.

दमणगंगा- वैतरणा - गोदावरी नदीजोड प्रकल्प व दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प या दोन्ही प्रकल्पास ऑक्टोबर-२०२४ मध्ये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर सर्व आवश्यक वैधानिक मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर कार्यवाही पूर्ण होताच योजनेचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) सिंहस्थ कुंभमेळा अंतर्गत श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर परिसरातील विकेंद्रित पाणीसाठा (De-Centralised Water Bodies) पूर्णपणे भरण्यासाठी तसेच त्र्यंबकेश्वर परिसरातील गोदावरी नदी कायमस्वरूपी प्रवाहित राहण्यासाठी गौतमी गोदावरी धरण ते त्र्यंबकेश्वर उपसा प्रणाली योजना, ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक योजनेचे काम प्रगतीत आहे. त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने दिनांक १८/०९/२०२५ अन्वये रुपये ३२८.८० कोटी रकमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया राबवून दिनांक ११/१२/२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत, सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर असून २५% काम पूर्ण झाले आहे व कामावर आज अखेर रुपये ५३.८६ कोटी इतका खर्च झालेला आहे. सदर काम माहे मार्च, २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) वरीलप्रमाणे

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ओशिवरा येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल प्रशासनाने अचानक शाळा बंद केल्याबाबत

**(३०)** * **१०४०७ श्री.राजहंस सिंह, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ओशिवरा येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून ही शाळा बंद केल्यास जवळपास ६५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक

भवितव्याबद्दल अनिश्चितता निर्माण झाली असून या प्रकरणी मा.शालेश शिक्षण मंत्री महोदयांनी चौकशीचे आदेश दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची तसेच त्यांना अन्य शाळांमध्ये प्रवेश मिळविताना अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले असून शाळा बंद करण्यामागील कारणे काय आहेत, तसेच सदर शाळा बंद करण्यापूर्वी शिक्षण विभागाची आवश्यक परवानगी घेण्यात आली होती काय, शाळा प्रशासनाने नियमित प्रक्रिया पूर्ण न करता ई-मेलद्वारे ट्रान्सफर सर्टिफिकेट पाठवून शाळा बंद झाल्याची अधिकृत नोंद टाळण्याचा प्रयत्न केल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच संबंधित शाळा व्यवस्थापनाविरुध्द प्रशासकीय, दंडात्मक अथवा फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच, प्रभावित विद्यार्थ्यांना अन्य शाळांमध्ये प्रवेश उपलब्ध करून देणे, पालकांकडून आकारण्यात आलेल्या शुल्काच्या परताव्याबाबत आवश्यक निर्देश देणे तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी खासगी शाळांवर नियंत्रण ठेवणे, शाळा बंद करण्याची प्रक्रिया अधिक पारदर्शक करणे व विद्यार्थ्यांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

सिटी इंटरनॅशनल स्कूल, ओशिवरा अंधेरी (प.), मुंबई या इंग्रजी माध्यमाच्या शाळेस २००३ मध्ये इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापनाने शाळा सुरु करण्यासाठी भाड्याने जागा घेतली होती. सदर जागा मालकाने भाडेकराराच्या रकमेत मोठ्या प्रमाणात वाढ केली असल्याने, संस्था शाळा चालविण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने, शाळा व्यवस्थापनाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून शाळा बंद करीत असल्याबाबत शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, पश्चिम विभाग व शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांना ई-मेलद्वारे कळविले आहे.
(३) सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून शाळा बंद करण्याबाबत शाळा व्यवस्थापनाने फेब्रुवारी, २०२६ मध्ये सर्व पालकांना कळविले आहे. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याकडून अथवा पालकांकडून सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता फी आकरण्यात आलेली नाही. तसेच, याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे नजीकच्या आयसीएसई शाळांमध्ये समायोजन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना आरटीई अंतर्गत शालेय प्रवेशापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत

**(३१) * ८८७३ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षण हक्क कायदा (RTE) अंतर्गत प्रवेश प्रक्रियेच्या लॉटरीत केवळ १ लाख ५ हजार ८११ विद्यार्थ्यांनाच मोफत शालेय प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आल्याची बाब दिनांक १६ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रवेश प्रक्रियेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तब्बल १ लाख ८३ हजार ४७५ विद्यार्थी मोफत शिक्षणापासून वंचित राहिले असून त्यापैकी सुमारे ८६ हजार ३४ विद्यार्थी प्रतीक्षा यादीत असूनही त्यांना प्रत्यक्ष प्रवेश मिळण्याबाबत कोणतीही निश्चितता नसल्याने पालकांमध्ये संभ्रम व चिंता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरटीई अंतर्गत पात्र असूनही वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय प्रवेश उपलब्ध करून देण्यासाठी तसेच आरटीई प्रवेश प्रक्रियेमध्ये पारदर्शकता व सर्व पात्र विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

आरटीई अंतर्गत नोंदणी करणे शाळांना बंधनकारक आहे. आरटीई कायदा, २००९ नुसार दिनांक २१/०१/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित शाळेने २५ टक्के प्रवेशाकरीता प्रवेश स्तर (Entry Level) नोंदवावेत, प्रवेश स्तर (Entry Level) शाळेने ठरवावा असे नमूद केले आहे.

राज्यातील सर्व अभ्यासक्रमांच्या शाळांची नोंद आरटीई पोर्टलवर करण्यात आल्याप्रमाणे नियमानुसार पात्र शाळांचा समावेश ऑनलाईन प्रवेश प्रणालीवर करण्यात येतो. त्यानुसार, बालकांना शाळांमध्ये प्रवेशस्तरावर एकूण प्रवेश संख्येच्या २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्यात येतो. बालकांना ऑनलाईन प्रवेश प्रणालीच्या प्रक्रियेमध्ये अडचणी येऊ नयेत, याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या स्तरावरून सूचना देण्यात येतात.

आरटीई प्रवेश प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येऊन सोडतीद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. त्यानुसार, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी सद्य:स्थितीमध्ये ९५,३८८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांच्या संचमान्यता व अनुदान आदेशांमधील पदसंख्येतील विसंगती दूर करण्याबाबत

**(३२) * ९११७ श्री.किरण सरनाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या संचमान्यता शालार्थ प्रणालीशी जोडण्यात आलेल्या असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन शालार्थ प्रणालीतील मंजूर पदांनुसार अदा करण्यात येत असल्याने प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा तसेच बहुमाध्यम, रात्रशाळा व इतर शाळांच्या सन २०२५-२६ च्या संचमान्यतांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी, मंजूर पदे व कार्यरत पदांतील तफावत तसेच शिक्षक संख्येतील विसंगती आढळून आल्याच्या तक्रारी शिक्षण संचालनालयास प्राप्त झाल्या असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचमान्यता शालार्थ प्रणालीशी जोडण्यात आल्यामुळे सुमारे २२ हजार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वेतनापासून वंचित राहिले होते व त्यांचे वेतन "व्हॅलिडेशन टॅब" या तात्पुरत्या सुविधेद्वारे अदा करण्यात आले असून "व्हॅलिडेशन टॅब" ही केवळ तात्पुरती व्यवस्था असून प्रत्यक्ष संचमान्यता दुरुस्ती करणे आवश्यक असतानाही शासनामार्फत विशेष शिबिरे किंवा तातडीची दुरुस्ती मोहीम राबविण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संचमान्यता दुरुस्तीची प्रकरणे जिल्हा शिक्षणाधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षण संचालक व आय.टी. एजन्सी अशा अनेक स्तरांवर पाठवावी लागत असल्याने प्रकरणे वेळेत निकाली निघत नाहीत तसेच अनेक शाळांच्या अनुदान आदेशांमध्ये संचमान्यतेनुसार शिक्षक पदांची संख्या समाविष्ट न झाल्यामुळे पात्र शिक्षक आजही अनुदान व वेतनापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संचमान्यतेतील चुका वेळेत दुरुस्त न झाल्यास शाळांना अत्यल्प शिक्षकांच्या सहाय्याने सर्व विषयांचे अध्यापन करावे लागत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे तसेच संचमान्यता दुरुस्तीची प्रकरणे वेळेत निकाली निघण्यासाठी दुरुस्तीचा अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालक अथवा शिक्षणाधिकारी स्तरावर देणे, विशेष दुरुस्ती शिबिरे आयोजित करणे तसेच शालार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(५) असल्यास, संचमान्यता व अनुदान आदेशांमधील पदसंख्येतील विसंगती दूर करून संबंधित शिक्षकांना नियमित वेतन व अनुदान मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

खाजगी अनुदानित, अंशत: अनुदानित व विनाअनुदानित व्यवस्थापनांच्या तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व व्यवस्थापनांच्या शाळांपैकी काही शाळांच्या संचमान्यता तांत्रिक कारणामुळे प्रलंबित आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या संच मान्यतेमध्ये प्रथमतःच संच मान्यतेमध्ये मंजूर असलेल्या कार्यरत पदांवरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे व इतर तपशील समाविष्ट करुन सन

२०२५-२६ च्या संच मान्यता शिक्षणाधिकारी लॉगिनला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार क्षेत्रिय स्तरावर समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन झाले आहे परंतु समायोजन झालेल्या शाळेत हजर झाले नाहीत अशा कर्मचाऱ्यांचे वेतन आहरित करता येणार नाही. याव्यतिरिक्त सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट अखेर वेतन आहरित करण्याचे निर्देश संबंधित क्षेत्रिय यंत्रणेला देण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) संचमान्यतेमधील सध्या उपलब्ध असलेल्या सुविधांपैकी शिफ़्टिंग ऑफ़ पोस्ट, शाळा व्यवस्थापन बदल, कार्यरत पदांमध्ये दुरुस्ती करणे, इत्यादी सुविधा शिक्षण संचालनालय व विभागीय शिक्षण उपसंचालक स्तरावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

(५) संच मान्यतेमधील मान्य पदांचे (पदनाम) व संचमान्यतेमध्ये मान्य पदांइतके (पदसंख्या) वेतन शालार्थ प्रणालीमधून अदा होणार आहे. त्यानुषंगाने मॅपिंगची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परीक्षा व्यवस्थापनातील तांत्रिक त्रुटींमुळे परीक्षांचे निकाल प्रलंबित असल्याबाबत

**(३३) * ८६९६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये घेण्यात आलेल्या सुमारे १२०० परीक्षांपैकी १९० पेक्षा अधिक हिवाळी परीक्षांचा निकाल माहे एप्रिल, २०२६ पर्यंत जाहीर न झाल्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना उन्हाळी परीक्षांचे अर्ज भरणे, पुढील शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश, शिष्यवृत्ती प्रस्ताव, रोजगार व स्पर्धा परीक्षांसाठी अर्ज करताना अडचणी निर्माण झाल्या असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाच्या परीक्षा प्रक्रियेचे सॉफ्टवेअर व तांत्रिक व्यवस्थापन यापूर्वी ‘प्रो मार्क’ या कंपनीकडे सोपविण्यात आले होते, तथापि, संबंधित कंपनीचा करार रद्द करून परीक्षा व्यवस्थापनाशी संबंधित कामकाज ‘कोएमप्ट एज्युटेक’ या कंपनीकडे वर्ग करण्यात आले असून ‘प्रो मार्क’ कंपनीकडील विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक, गुणपत्रिका, परीक्षा व निकाल संदर्भातील डेटा अद्याप पूर्णपणे सॉफ्ट कॉपी स्वरूपात नवीन कंपनीकडे हस्तांतरित न झाल्यामुळे निकाल प्रक्रिया, गुण पडताळणी, परीक्षा नोंदणी व इतर प्रशासकीय कामकाजामध्ये तांत्रिक अडथळे निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकारामुळे विद्यार्थी मानसिक तणावाखाली असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होण्याची तसेच शैक्षणिक संधी गमावण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबंधित कंपन्या व विद्यापीठ प्रशासनाने सॉफ्ट कॉपी स्वरूपात डेटा नवीन कंपनीकडे हस्तांतरित न करणाऱ्या संबंधीतांवर कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थ्यांचे प्रलंबित निकाल तात्काळ जाहीर करून परीक्षा

प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, तांत्रिक सुसूत्रता व कालबध्दता आणण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. विद्यापीठांच्या परीक्षांबाबतच्या कामांकरीता नेमण्यात आलेल्या मे. प्रोमार्क या कंपनीने २०२५ पर्यंतचा परीक्षेचा डेटा विद्यापीठाच्या तांत्रिक कक्षास दिला होता.परंतु कंपनीने विद्यापीठाला हव्या असलेल्या नमुन्यामध्ये (Format) डेटा उपलब्ध करून दिला नसल्याने निकाल विभागात उपलब्ध असलेल्या अभिलेखावरुन गुण घेऊन निकाल घोषित करण्यात आले आहेत.
(३) हे खरे नाही.विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान झालेले नाही. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांची शैक्षणिक संधी गमावली गेली नाही.
(४) मे. प्रोमार्क कंपनीने विद्यापीठाला हव्या असलेल्या नमुन्यामध्ये (Format) डेटा उपलब्ध करून दिला नसल्याने सदर कंपनीकडे विद्यापीठाच्या तांत्रिक कक्षामार्फत पत्रव्यवहार सुरु आहे. तसेच संबंधितांस कायदेशीर नोटीस पाठविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३४) * ९६३५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (SSC & HSC Board) ही महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम, १९६५ अंतर्गत स्थापन झालेली स्वायत्त शैक्षणिक संस्था असून, मंडळातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व बदली संदर्भातील सन १९९३ पासून अस्तित्वात असलेले निकष बदलून 'शासकीय बदल्यांचा विनियम, २००५' नियमबाह्य पध्दतीने लागू करण्याचा प्रयत्न माहे डिसेंबर, २०२५ पासून सुरू असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मंडळातील एकूण ५११ मंजूर पदांपैकी सुमारे ३८६ कनिष्ठ लिपिक पदे रिक्त असल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असून, परीक्षा आयोजन, गोपनीय कामकाज, उत्तरपत्रिका प्रक्रिया व निकाल जाहीर करण्याच्या कामावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंडळाचे स्वतंत्र विनियम व उपविधी अस्तित्वात असतानाही स्वायत्त संस्थेवर शासकीय नियमांची सक्ती करण्यात येत असल्याच्या निषेधार्थ पुणे विभागीय मंडळातील कर्मचारी संघटनांनी दिनांक २८/०४/२०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले असून त्यामुळे मंडळाचे नियमित शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज विस्कळीत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्मचारी संघटनांसोबत झालेल्या चर्चेमध्ये प्रशासनामार्फत कोणताही ठोस तोडगा काढण्यात आलेला नसून, रिक्त पदभरती व सेवा विषयक प्रश्नांबाबत प्रशासनाच्या उदासीनतेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांशी संबंधित शैक्षणिक कामकाजावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने मंडळातील रिक्त कनिष्ठ लिपिक पदे भरण्याबाबत आणि पदोन्नती व बदलीच्यासंदर्भातील जुन्या निकषांच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) नियमबाह्य पध्दतीने लागू करण्यात आले आहे, ही बाब खरी नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (SSC & HSC Board) ही महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अधिनियम १९६५ अंतर्गत स्थापन झालेली स्वायत्त शैक्षणिक संस्था असून, मंडळातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व बदली संदर्भातील सन १९९३, २०१७ व २०२० मध्ये मंडळ कर्मचारी यांचेसाठी बढती, बदलीबाबतचे सुधारित मार्गदर्शक निकष कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने तयार करण्यात आले होते.

सदरच्या नियमामध्ये परिस्थितीनुरुप बदल करण्याची आवश्यकता असल्याने व त्याची अंमलबजावणी करताना त्यामध्ये अनेक त्रुटी आढळून येत असल्यामुळे मंडळाच्या कार्यकारी परिषदेमध्ये घेण्यात आलेल्या ठरावाद्वारे मंडळ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ लागू करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मंडळाच्या मंजूर आकृतीबंधानुसार राज्यमंडळ व विभागीय मंडळात कनिष्ठ लिपिक संवर्गातील ५९१ पदे मंजूर असून १९९ पदे कार्यरत आहेत व कनिष्ठ लिपिक संवर्गाची ३९२ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांचा विचार करून मानधन तत्वावर आवश्यकतेनुसार अधिकारी व कर्मचारी घेतले जातात व कार्यालयीन कामकाज पार पाडले जाते.

(३) हे खरे नाही.

मंडळामध्ये तीन कर्मचारी संघटना कार्यरत असून त्यापैकी दोन संघटना आंदोलनात सहभागी होत्या. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व मध्यवर्ती कर्मचारी संघटना या संघटनांनी मंडळ प्रशासनास सहकार्य केले असून बदलीसंदर्भात महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ लागू करण्यास संमती दर्शविली आहे. तसेच मंडळाचे नियमित, शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज व फेब्रुवारी-मार्च २०२६ या परीक्षांच्या निकालांचे काम वेळेत पार पाडण्यात आले आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत राज्य मंडळातील कनिष्ठ लिपिक पदभरतीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे व या पदभरतीबाबत बिंदुनामावली तयार करण्याची प्रक्रिया सुरु असून ती अंतिम टप्यात आहे. तसेच परीक्षा आयोजन, गोपनीय कामकाज, उत्तरपत्रिका प्रक्रीया व निकाल जाहीर करण्याच्या कामावर कोणताही

विपरित परिणाम झालेला नसून गतवर्षीपेक्षा यावर्षी इ. १० वी १२ वी चा निकाल लवकर जाहीर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविणेबाबत

**(३५) * १०३१८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्ता आधारित व्हावी यासाठी शासनाने दिनांक २२ जून, २०२२ पासून‘पवित्र’ ऑनलाइन प्रणालीद्वारे भरती करणे बंधनकारक केले असून काही खासगी अनुदानित शाळांकडून पवित्र प्रणालीचा अवलंब न करता थेट शिक्षक भरती करण्यात आल्याच्या तसेच पवित्र पोर्टलवरील भरती प्रक्रियेत मोठ्या संख्येने उमेदवारांनी नोकरीची संधी नाकारल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे मे, २०२५ मध्ये अभियोग्यता परीक्षा झाल्यानंतरही प्रत्यक्ष भरती प्रक्रियेस विलंब होत असल्याने अनेक उमेदवार इतर रोजगाराकडे वळत आहेत, तसेच शिक्षक होण्यासाठी इच्छुक असलेल्या २,२८,८०८ उमेदवारांपैकी ४१,२०० उमेदवारांनी परीक्षा देऊनही पवित्र पोर्टलवर ‘सेल्फ सर्टिफिकेशन’ची नोंदणी करणे टाळले आहे, तसेच शासनाने विभागिय शिक्षण उपसंचालकाच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समित्या स्थापन केल्या असून समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भरतीसाठी परीक्षा जाहीर झाल्यानंतर ती लवकर न घेणे, निकाल उशिरा लागणे आणि खासगी शिक्षण संस्थांकडून ‘डोनेशन’ घेतले जाण्याची भीती, या सर्व कारणांमुळे ५८,७०० तरुण भरतीतून बाद झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समितीने आपल्या अहवालात कोणत्या शिफारशी केल्या आहेत व त्या शिफारशींच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली तसेच स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी अनुदानित शाळांतील रिक्त पदांची माहिती पवित्र पोर्टलवर वेळेत उपलब्ध करून नवीन शैक्षणिक सत्राच्या प्रारंभी शिक्षकांची नियुक्ती सुनिश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) राज्यातील शिक्षक भरती प्रक्रिया ही पवित्र पोर्टल या ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे पार पाडण्याचा निर्णय, दिनांक २२/०६/२०१७ रोजी शासनाने घेतला आहे. काही खाजगी व्यवस्थापनानी पवित्र पोर्टल शिवाय नियुक्त्या केल्या आहेत. अशा नियुक्त्यांना मान्यता देण्यात आलेली नाही. काही प्रकरणात अशा नियुक्त्यांना मान्यता देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशाना मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.
(२) शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थां, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित अशा व्यवस्थापनांच्या शाळांना अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनानंतर पदभरतीस मान्यता दिली जाते. त्याचप्रमाणे अद्यावत बिंदूनामावलीनुसार पदभरती होणे आवश्यक असते. सद्य:स्थितीत समायोजनाची प्रक्रिया संपन्न झाली

असून पवित्र पोर्टलवर जाहिराती घेण्यास सुरुवात झाली आहे. लवकरच पात्र उमेदवारांच्या शिफारशी त्या त्या संस्था व्यवस्थापनांना करण्याबाबतची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पवित्र पोर्टलशिवाय झालेल्या नियुक्त्यांचा तपशिल विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना शासनास सादर करण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार त्या त्या विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समित्या याबाबतची माहिती संकलित करीत आहेत. एकत्रित माहिती शासनास आयुक्त (शिक्षण) कार्यालयामार्फत प्राप्त झाल्यानंतर पवित्र पोर्टलशिवाय झालेल्या अनियमित नियुक्त्यांबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(३) वर उल्लेख करण्यात आल्याप्रमाणे समायोजन, बिंदू नामावली तपासणीनंतर पवित्र पोर्टलवर जाहिराती घेण्यास सुरुवात करण्यात आली आहे. शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी दिलेल्या उमेदवारांपैकी काही उमेदवारांनी स्वप्रमाणिकरण प्रक्रियेत स्वेच्छेने भाग घेतलेला नाही. त्यामुळे सदर शिक्षक भरतीतून बाद झाले आहेत, हा दावा वस्तुस्थितीवर आधारीत नाही. खाजगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक पदभरती अधिक पारदर्शक व्हावी यासाठी शासन निर्णय, दिनांक ०२/०४/२०२६ अन्वये मानक कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

(४) विभागीय शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखालील समित्यांकडून केवळ पवित्र पोर्टलशिवाय झालेल्या नियुक्त्यांची माहिती अपेक्षित आहे. सद्य:स्थितीत पवित्र पोर्टलवर संबंधित व्यवस्थापनांच्या शिक्षक पदभरतीबाबतच्या जाहिराती घेण्यात येत असून लवकरच पात्र उमेदवारांच्या शिफारशी करण्याबाबतची प्रक्रिया राबविण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील २२५ सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिल्याबाबत

**(३६) * ८८२० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे जुलै,२०२२ मध्ये २२५ सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिली असून जलसंपदा विभागाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्याला अतिरिक्त २.५६ लाख कोटी रुपयांच्या प्रचंड निधीची आवश्यकता लगणार असून सदर निधीच्या मान्यतेमध्ये नव्या प्रकल्पांसह आधीच सुरु असलेल्या प्रकल्पांच्या वाढीव खर्चाचाही समावेश असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या आर्थिक नियोजनावर यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले असून आर्थिक तरतुदीशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रकल्पांना मान्यता देण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे राज्य आर्थिक संकटात सापडले असल्याने यांस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) या प्रकल्पांमध्ये चार प्रशासकीय मान्यताप्राप्त नदीजोड प्रकल्पांचा समावेश असून त्यांच्या कामाची एकूण किंमत रुपये १.०७ लाख कोटी आहे. राज्यामध्ये सुमारे ४२% क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. त्यामुळे अतिरिक्त मुबलक पाणी उपलब्ध असलेल्या कोकण प्रदेशातून तुटीच्या तापी व गोदावरी खोऱ्यात, तसेच पूर्व विदर्भातील वैनगंगा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी विदर्भातील अवर्षणग्रस्त व आत्महत्याग्रस्त प्रदेशासाठी वापरण्याचे नियोजन आहे. या नदीजोड प्रकल्पांना आवश्यक पर्यावरण मान्यता, वनजमीन संपादन, इत्यादीस वैधानिक मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. अशा प्रकल्पांना केंद्राच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमधून (PMKSY) निधी देण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आली आहे. इतर प्रकल्प पूर्ण करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासन अर्थसाहाय्यित योजना, नाबार्ड अशा बाह्यसहाय्यित स्त्रोतांतून निधी उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. तसेच, "मित्रा" संस्थेच्या माध्यमातून World Bank, Asian Development Bank(ADB), Japan International Co-opration Agency (JICA), इ. आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांमार्फत निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. नवीन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता तसेच सुधारित प्रशासकीय मान्यता देणे ही धोरणात्मक बाब असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या नांदेड मंडळातील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(३७) * ९१९१ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या नांदेड मंडळामध्ये मुख्य कालवे व उप-कालव्यांच्या (Sub-minors) कॉंक्रिटीकरण व लायनिंगच्या कामात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहार झाल्याचा तसेच अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम झाले असल्याचा आरोप करण्यात येत असून, सदर प्रकरणाची विशेष समितीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केली असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांमध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा जादा खर्च, निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरणे, कालव्यांच्या कॉंक्रिटीकरणामध्ये तांत्रिक निकषांचे पालन न करणे, काम पूर्ण न करताही देयके अदा करणे, तसेच गुणवत्ता नियंत्रण प्रक्रियेमध्ये त्रुटी आढळल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने कोणते गैरव्यवहार, आर्थिक अनियमितता, कामांमधील त्रुटी अथवा शासकीय निधीच्या गैरवापर करुन सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी, कंत्राटदार व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अंदाजपत्रकानुसारच कामे करण्यात आली आहेत. साहित्याच्या चाचण्या गुण नियंत्रण विभाग व NABL Accredited Laboratory कडून करुनच साहित्य वापरण्यात आले आहे. संधानकाचे संकल्पन (Concrete Mix Design) करुनच संधानकाचे काम त्यानुसार Concrete करण्यात आले. या कामाची तपासणी वेळोवेळी कामे गुणनियंत्रण विभागाकडून करण्यात येते.

(३) होय.

वरील तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक लाभ क्षेत्र विकास, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १०/१०/२०२५ रोजी कार्यस्थळावर प्रत्यक्ष क्षेत्रिय पाहणी केली असता खालील निरिक्षणे नोंदविली आहेत :- संधानकाचे मिश्रसंकल्पन व मातीकामाचे क्षेत्रिय घनता चाचण्या गुणनियंत्रण यंत्रणेकडून मंजूर करूनच काम करण्यात आले आहे. मातीकामाचे क्षेत्रिय घनता चाचण्यांचे निष्कर्ष समाधानकारक आढळले. संधानकासाठी मंजूर मिश्रसंकल्पन, कॉन्क्रिट प्लेसमेंट रजिस्टर, संगणकीय पावती तपासली असता त्यामध्ये तफावत आढळून आलेली नाही. क्षेत्रिय पाहणीमध्ये एकूण ४२४०० मी. लांबीमध्ये अस्तरीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. यापैकी ६० मी. लांबीमध्ये तडे गेले होते.

हे काम निविदेतील शर्तीनुसार दुरुस्त करण्याबाबत संबंधित कंत्राटदार मे.ए.जी. कंस्ट्रक्शन व मे.व्ही.आर.घुगे यांना सूचना दिलेल्या होत्या व त्याप्रमाणे कालव्यावरील सदरील भाग तोडून नव्याने अस्तरीकरण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या पीककर्ज माफी योजनेच्या अंमलबजावणीस विलंब होत असल्याबाबत

**(३८) * ९३०१ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, श्री.प्रविण दरेकर, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना दिनांक ३० सप्टेंबर,२०२५ पर्यंतचे रुपये २ लाखांपर्यंतचे थकीत पीककर्ज माफ करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ६ मार्च, २०२६ रोजी केली असून सदर घोषणेनंतरही दिनांक ३० मार्च, २०२६ रोजीपर्यंत शासननिर्णय निर्गमित करण्यात आलेला नसल्यामुळे बँकेकडून कर्जमाफीची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ करण्याचा निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये घेतला असून त्यानुसार बंद प्रक्रियेत असलेल्या व नोंदणी रद्द झालेल्या संस्थांचे तसेच कार्यरत संस्थांचे मिळून एकूण १३२ कोटी ५४ लाख रुपयांचे मुद्दल कर्ज माफ करण्यास मान्यता देण्यात आली असून सदर निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ४२ हजार ८४२ शेतकऱ्यांना होणे अपेक्षित असताना अनेक लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप थकबाकी दर्शविण्यात येत असून त्यामुळे त्यांना नवीन पीक कर्ज व इतर बँकिंग सुविधा मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित शासन निर्णयाच्या अभावामुळे राष्ट्रीयकृत, जिल्हा मध्यवर्ती व सहकारी बँकांकडून शेतकऱ्यांकडे थकीत कर्जवसुलीसाठी तगादा लावण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून दिनांक ३१ मार्चपर्यंत कर्जाचे नूतनीकरण किंवा परतफेड न झाल्यास सवलतीचा व्याजदर संपुष्टात येऊन शेतकऱ्यांवर वाढीव व्याजाचा बोजा पडत आहे तसेच थकीत कर्जामुळे पुढील खरीप हंगामासाठी नवीन पीककर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यांवरील थकबाकी कमी करून कर्जमाफीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज व बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व पात्र शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेल्या पीककर्ज माफी योजनेचा लाभ तातडीने मिळावा यासाठी शासननिर्णय निर्गमित करणे, बँकांना आवश्यक निर्देश देणे तसेच कर्जवसुलीस स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) सहकार विभागाच्या दिनांक ०२/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर करण्यात आली आहे.
(२) व (३) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक ३१/१२/२०२४ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात कर्जमाफी योजना राबवयाची झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी राज्य शासनाने घ्यावयाची आहे. याबाबत वित्तीय संस्थांना कोणताही आर्थिक भार दयायचा नाही असे निर्देश आहेत. तद्नंतर, भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ३१/१२/२०२४ रोजीच्या मार्गदर्शक सूचना मागे घेतल्या असून, दिनांक २८/११/२०२५ रोजी नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. या सूचनांतील Government Debt Relief Schemes (DRS) विचारात घेऊन त्यानुसार उपसा सिंचन योजनांच्या कर्जमाफीचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ११/०६/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बावनथडी (ता.तुमसर, जि.भंडारा) प्रकल्पातील स्वयंचलित जलनियंत्रण प्रणालीसाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(३९) * ९१४६ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील बावनथडी प्रकल्पांतर्गत उजवा मुख्य कालवा व इतर वितरिकांवरील सुमारे ४०० गेट्सच्या स्वयंचलित जलनियंत्रण प्रणालीसाठी (ऑटोमेशन) ४० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून, निधीअभावी सदर महत्त्वाकांक्षी प्रकल्प रखडण्याची शक्यता निर्माण झाली असून, प्रत्येक गेटवर स्वयंचलित प्रणाली बसवण्यासाठी अंदाजे १० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत ऑटोमेशनच्या अभावामुळे पाण्याचे अचूक वितरण व नियोजन करण्यात अडचणी येत असून, मानवी हस्तक्षेपामुळे तांत्रिक त्रुटी, अनियमित जलवाटप व पाण्याची नासाडी होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त झाल्या असून गेट ऑटोमेशन झाल्यास वितरिकांची तोडफोड रोखणे, पाण्याचे समन्यायी व पारदर्शक वाटप करणे आणि कर्मचाऱ्यांवरील अवलंबित्व कमी करणे शक्य होऊन प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बावनथडी प्रकल्पातील गेट च्या स्वयंचलित जलनियंत्रण प्रणालीसाठी (ऑटोमेशन) आवश्यक निधी मंजूर करून काम सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

बावनथडी प्रकल्पासंबंधात उजवा मुख्य कालवा व इतर वितरिकांवरील गेट्सच्या ऑटोमेशनच्या दृष्टीने सद्य:स्थितीत कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

तथापि, बावनथडी प्रकल्पांतर्गत मुख्य उजवा कालवा व इतर वितरीकांवरील सुमारे १५४४ गेट्स पैकी नादुरुस्त असलेल्या सुमारे १३५ गेट्सच्या दुरुस्तीचे काम हाती घेणे प्रस्तावित आहे.
(२) हे खरे नाही,

सद्य:स्थितीत ऑटोमेशनच्या अभावामुळे पाण्याचे वितरण व नियोजन करण्यात अडचणी येत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच अनियमित जलवाटप व पाण्याची नासाडी होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेल्या नाहीत.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील बनावट शालार्थ आयडी प्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(४०) * १०१९६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यात बनावट शालार्थ आयडी प्रकरणी काही शाळा व संस्थांशी संबंधित १०० व्यक्तींना चौकशी नोटिसा बजावण्यात आल्याची बाब दिनांक ९ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी प्राथमिक चौकशीत काय निष्पन्न झाले आहे तसेच बनावट शालार्थ आयडीच्या माध्यमातून वेतन वितरण, कर्मचारी नोंदी, सेवा अभिलेख अथवा इतर आर्थिक व प्रशासकीय बाबींमध्ये गैरप्रकार झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित प्रकरणातील दोषी व्यक्ती, शाळा व्यवस्थापन, संस्था पदाधिकारी अथवा संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय, विभागीय, दंडात्मक अथवा फौजदारी कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच भविष्यात अशा प्रकारचे गैरप्रकार टाळण्यासाठी शालार्थ प्रणाली अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) याप्रकरणी नाशिक रोड, नाशिक येथे अनुक्रमे दिनांक २७/०३/२०२५ व दिनांक १२/०३/२०२६ रोजी गुन्हा रजिस्टर क्र.०१६४/२०२५ व क्र.२१६/२०२६ दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच भविष्यात अशा प्रकारचे गैरप्रकार टाळण्यासाठी शालार्थ आयडी देतांना अनुसरावयाची कार्यपध्दती व अभिलेखे डिजिटलाईज करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करुन शालार्थ आयडी तयार करतेवेळी आधार लिंक्ड मोबाईल ओटीपी सुविधा सुरू करण्यात आली आहे. एन.आय.सी कडील संच मान्यता एपीआय चा वापर करुन संच मान्यता व शालार्थ प्रणाली यांचे इंटिग्रेशन करुन त्याआधारे शाळानिहाय पोस्ट मॅपिंग प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. तसेच, दिनांक १२/०६/२०२६ च्या शासन निर्णयान्वये शालार्थ प्रणालीत नाव समाविष्ट करण्याबाबत सुधारित कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे वेतन स्थगित केल्याबाबत

**(४१) * ९०१३ श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त ठरविण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अन्यत्र समायोजन होण्यापूर्वीच त्यांचे वेतन थांबविण्यात आल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम २६ (२) व २६ (३) नुसार अतिरिक्त कर्मचाऱ्यांना अन्यत्र समायोजित करून प्रत्यक्ष कार्यमुक्त करण्यापूर्वी त्यांची नावे मूळ शाळेच्या आस्थापनेवरून कमी करता येत नाहीत तसेच त्या कालावधीत त्यांचे वेतन देणे आवश्यक असल्याची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित नियम अस्तित्वात असताना अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन पूर्ण होण्यापूर्वीच वेतन स्थगित करण्यात आल्याने संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक, मानसिक व कौटुंबिक अडचणींना सामोरे जावे लागत असून अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या समावेशनापूर्वी वेतन थांबविण्याच्या बेकायदेशीर कार्यवाही करणाऱ्या शिक्षण आयुक्त कार्यालयातील संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे वेतन, समायोजन व सेवासुरक्षा याबाबत सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे समायोजन झाले आहे, परंतु समायोजित शाळेत हजर झाले नाहीत अशा शिक्षकांचे वेतन आहरित करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) समायोजित शाळेवर हजर झालेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन हजर झालेल्या शाळेतून आहरित करणेबाबत, तसेच शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ च्या निकषानुसार गट ९-१० मध्ये पदे अनुज्ञेय न झालेल्या व समायोजन होण्यास अडचणी निर्माण झालेल्या शाळांमधील शिक्षकांचे वेतन मूळ शाळेतून आहरित करणेबाबत निर्देश देण्यात आले आहे.

यात्यतिरिक्त सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे ऑगस्ट अखेर वेतन आहरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

-----------------

## मुर्तिजापूर (जि.अकोला) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(४२)** * **१०६९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तीजापूर (जि.अकोला) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये खरेदीदाराचा परवाना घेऊन १ कोटी ८४ लाख ९९ हजार ५१८ रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या मुख्य आरोपींवर गुन्हा दाखल करून तातडीने अटक करून गैरव्यवहारातील थकीत रक्कम त्यांच्याकडून वसूल करून अडतदारांना न्याय मिळवून देण्यासाठी 'समर्थन' संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.पोलीस महासंचालक, आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग (पुणे व अकोला) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक १६ एप्रिल २०२६ वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

एफ.आय.आर. नुसार रूपये ०१ कोटी ०६ लाख १४ हजार ६६९/- इतक्या रक्कमेची आर्थिक फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

मुर्तिजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने केलेल्या लेखी तक्रारीच्या चौकशीअंती दिनांक ०४/०३/२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत कलम ३(५), ३१६(५), ३१८(४) नुसार पोलीस स्टेशन, मुर्तिजापुर येथे प्रथम खबर (FIR) क्र.०३०७/२०२६ गुन्हा दाखल झालेला आहे.

(३) सदर प्रकरणी एफ.आय.आर दाखल झाल्यानंतर आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग, अकोला यांनी ३ पैकी २ आरोपींना अटक केलेली असून सद्य:स्थितीत ते न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत. आजतागायत आरोपींकडून रुपये ४५ लाखापर्यंत वसुली करण्यात आली असून सदर रक्कम आर्थिक गुन्हे शाखा,

अकोला यांचेकडे जमा आहे. पोलीस विभागामार्फत तपास सुरू असून प्रकरण मा.फौजदारी न्यायालय, मुर्तिजापुर येथे न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखर उद्योगांना चालना देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४३) * ८९३४ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ असलेल्या साखर उद्योगावर आर्थिक संकट ओढवले असल्याने अनेक साखर कारखाने कर्जबाजारीपणामुळे आर्थिक अडचणीत आले असून, या आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी सहकारी साखर कारखानदारांनी शासनाकडे प्रति टन रूपये ५०० एवढ्या अनुदानाची मागणी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सुमारे ४५ कारखान्यांना साखर आयुक्तालयाने ४,३१५ कोटी रूपयांच्या थकबाकीपोटी नोटीसा बजाविल्या असल्यामुळे अनेक कारखाने बंद पडण्याच्या उंबरठ्यावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हजारो शेतकरी व कामगारांच्या उपजीविकेवर आर्थिक परिणाम करणाऱ्या या साखर उद्योगाला चालना देण्याकरीता तातडीची आर्थिक मदत (बेलआउट) उपलब्ध करून देण्यासाठी तसेच दीर्घकालीन शाश्वत आर्थिक व बँकिंग संरचना उभारण्याकरीता सहकार्य करण्यासाठी, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) होय.
(२) हंगाम २०२५-२६ मध्ये आजअखेर एकूण ८१ साखर कारखान्यांना एफआरपी थकबाकीपोटी नोटीसा बजाविल्या असून त्यापैकी ७ साखर कारखान्यांवर रक्कम रुपये २३२.७९५४ कोटी रकमेची आरआरसी कारवाई करण्यात आली आहे.एफआरपी अदायगीचे प्रमाण ९८.३३% आहे.
(३) सन २०२५-२६ च्या हंगामातील थकीत एफआरपी देणेसाठी मा.मुख्यमंत्री यांचे नेतृत्वाखाली नवी दिल्ली येथे मा.केंद्रिय मंत्री (गृह आणि सहकार) यांच्या कडे झालेल्या बैठकीत सहकारी साखर कारखान्याकडील अडचणी विस्तृतपणे मांडल्या असून प्रत्येक अडचणींबाबत केंद्रशासनाकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेणेबाबत मा.केंद्रिय मंत्री (गृह व सहकार) यांनी मान्य केले आहे. त्यामुळे कारखान्यातुन निर्मित साखरेला MSP दर वाढविणे, प्रलंबित FRP देण्यासाठी सॉफ्ट लोन योजना जाहीर करणे, साखर कारखान्यामध्ये उत्पादीत इथेनॉलचा दर व कोटावाढविणे याबाबत केंद्र शासनास विनंती केली असून त्याप्रमाणे केंद्र शासनाकडे पाठपुरावा चालु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना किमान आधारभूत योजनेंतर्गतचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(४४) * ९९५६ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, श्री.संजय खोडके :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (MSP) योजनेचा अपेक्षित लाभ मिळत नसून सन २०२५-२६ हंगामात उत्पादित तुरीच्या तुलनेत अत्यल्प प्रमाणात शासकीय खरेदी झाल्याने बहुतांश शेतकऱ्यांना आपली तूर हमीभावापेक्षा रुपये ४०० ते रुपये १००० प्रति क्विंटल कमी दराने खुल्या बाजारात विकावी लागली असून त्यामुळे त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) सन २०२५-२६ मध्ये उत्पादित तुरीपैकी केवळ २७.०२ टक्के तूर हमीभावाने खरेदी झाली असून खरेदीचे उद्दिष्ट सुमारे २०.१३ टक्केच पूर्ण झाले आहे, तसेच, राज्यातील एकूण ९८४ मंजूर खरेदी केंद्रांपैकी केवळ ८९७ केंद्रेच प्रत्यक्षात सुरू करण्यात आली आणि अनेक पात्र शेतकऱ्यांची तूर खरेदी न करताच ही केंद्रे घाईघाईने बंद करण्यात आली असून हमीभाव खरेदीची मुदत संपुष्टात आल्यानंतरही सुमारे ३१,७४७ नोंदणीकृत शेतकऱ्यांची तूर खरेदी अथवा मोजमाप प्रलंबित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध जिल्ह्यांमध्ये, विशेषतः अमरावतीसह विदर्भातील खरेदी केंद्रांवर बारदाण्याची टंचाई, अपुरा मनुष्यबळ पुरवठा, वाहतूक व साठवणुकीच्या समस्या, तसेच नाफेड, एनसीसीएफ व संबंधित यंत्रणांच्या खरेदी प्रक्रियेतील विलंबामुळे अनेक शेतकऱ्यांना शासकीय खरेदीचा लाभ मिळू शकला नाही तसेच तूर खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी, जिल्हानिहाय खरेदी मर्यादा, गुणवत्ता व ओलावा निकष, बीम ॲप व पोर्टल आधारित प्रक्रिया यांमुळे शेतमाल खरेदीवर मर्यादा येऊन शेतकऱ्यांना खुल्या बाजारावर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे तूर व्यापाऱ्यांना खुल्या बाजारात कमी दराने ७,००० ते ७,५०० रुपये दराने तूर विकावी लागली व त्यातून त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तूर व इतर कडधान्यांची हमीभावाने प्रभावी, व्यापक व वेळेत खरेदी सुनिश्चित करण्यासाठी, प्रलंबित नोंदणीकृत शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करण्यासाठी, आवश्यक बारदाणा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी, खरेदी केंद्रांची संख्या व क्षमता वाढविण्यासाठी, खरेदीची मुदत वाढविण्यासाठी तसेच शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच तूर उत्पादक शेतकऱ्यांचे हितसंरक्षण, हमीभाव खरेदी व्यवस्थेतील त्रुटी दूर करणे, खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता व कार्यक्षमता वाढविणे तसेच भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती उद्भवू नये यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

हंगाम २०२५-२६ मध्ये हमीभावाने तूर खरेदीसाठी केंद्र शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार राज्यात दिनांक २०/०१/२०२६ ते दिनांक २४/०३/२०२६ व दिनांक ०६/०५/२०२६ ते दिनांक २५/०५/२०२६ या कालावधीत शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीस मुदत देण्यात आली. तर, खरेदीचा कालावधी दिनांक ०१/०२/२०२६ ते दिनांक ०१/०५/२०२६ पर्यंत होता.राज्यशासनाने केलेल्या विनंतीनुसार केंद्र शासनाने खरेदीची मुदत वाढविण्यास दिलेल्या मंजूरीनंतर दिनांक ०६/०५/२०२६ ते दिनांक ३१/०५/२०२६ पर्यंत

खरेदी प्रक्रीयेस मुदतवाढ देण्यात आली. खरेदीच्या दिनांक अखेर एकूण ७७,०७४ लाभार्थी शेतकऱ्यांकडून १,४३,१४५ मे.टन तूर खरेदी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून केंद्र शासनामार्फत किमान आधारभूत योजना राबविण्यात येते. हंगाम २०२५-२६ मध्ये तूर खरेदीसाठी किमान आधारभूत योजनेंतर्गत ८९७ केंद्र व आत्मनिर्भर भारत योजनेंतर्गत १७५ अशी एकूण १०७२ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली होती. सदर खरेदी केंद्रांवर १,३२,७०२ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली. नोंदणीकृत शेतकऱ्यांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे खरेदी प्रक्रीयेत सहभागी होण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा या योजनेसाठीचा सहभाग मोठ्याप्रमाणावर होता.तथापि, हंगाम २०२५-२६ मधील तूर खरेदी कालावधीच्या दरम्यान खुल्या बाजारात तूरीचे दर वाढल्याने शेतकऱ्यांनी हमीभावापेक्षा खुल्या बाजारात विक्री केली.

(३) हे खरे नाही.

विदर्भातील जिल्ह्यांकरीता ३४३ हमीभाव खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली होती. अमरावती जिल्ह्यासाठी ४५ खरेदी केंद्रांना मंजूरी देण्यात आली होती. सदर खरेदी केंद्रांवर १५६५८ तूर उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. नोंदणीकृत शेतकऱ्यांना भ्रमणध्वनी संदेशाद्वारे खरेदी प्रक्रीयेत सहभागी होण्याचे कळविण्यात आले होते.

किमान आधारभूत योजनेंतर्गत हमीभाव खरेदीसाठी बारदाना पुरवठा सुरळित व्हावा या उद्देशातून राज्यशासनामार्फत बारदाना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने राज्यातील हमीभाव खरेदी केंद्रांना पुरेसा बारदाना पुरवठा केला आहे.

(४) कृषी विभागाकडून प्राथमिक पूर्व आगाऊ अंदाजीत उत्पादकता जाहीर झाल्यानंतर किमान आधारभूत योजनेंतर्गत हमीभाव खरेदी मंजूर करण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येतो. सदर प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर ९० दिवसांपर्यंत खरेदी प्रक्रीया राबविण्यात येते. तसेच, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता खरेदीची मुदत वाढविण्यासंदर्भात वेळोवेळी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येतात. राज्यात किमान आधारभूत योजनेंतर्गत खरेदी प्रक्रीयेत पारदर्शकता व कार्यक्षमता वाढविण्यासाठी हंगाम २०२५-२६ पासून हमीभाव खरेदीकरीता राज्यस्तरीय नोडल संस्था, खरेदी केंद्र निश्चितीकरीता शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ अन्वये मार्गदर्शक सूचना व कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयान्वये खरेदी केंद्रांवर मॉईश्चर मिटर, चाळणी, ताडपत्री, संगणक, सीसीटीव्हीची सुविधा, संगणक चालवण्याची क्षमता असलेले जनरेटर, स्कॅनर असलेला स्मार्ट फोन, हमीभाव खरेदी योजनेचा अनुभव असलेला व ऑनलाईन पोर्टलवर तथा संगणक प्रणालीचे संपूर्ण ज्ञान असलेला प्रशिक्षीत सेवकवर्ग, इलेक्ट्रानिक वजन काटा इत्यादी सोयी सुविधा असणे अनिवार्य आहे.

तसेच, राज्यातील शेतकऱ्यांचे हित विचारात घेऊन मागील हंगामाच्या तुलनेत यावर्षी खरेदी केंद्रांची संख्या वाढविण्यात आली आहे. हंगाम २०२५-२६ मध्ये तूर खरेदीकरीता एकूण १०७५ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबई विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) * १०४०८ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशात वाढ झाली असून, पीएच.डी., संशोधनाधारित शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांसाठी परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याच्या उद्देशाने शासन व मुंबई विद्यापीठामार्फत कोणती धोरणे, सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहेत तसेच आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था, व्हिसा सहाय्य, समुपदेशन, आरोग्य, सुरक्षा व इतर आवश्यक सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परदेशी विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काचे स्वरूप काय आहे तसेच स्थानिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत त्यामध्ये किती फरक आहे तसेच वाढत्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशामुळे स्थानिक विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया अथवा शैक्षणिक संधींवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता, संशोधन क्षमता व जागतिक क्रमवारी (Ranking) सुधारण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व परदेशी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कोणते विशेष प्रोटोकॉल, तक्रार निवारण यंत्रणा व सहाय्यता सुविधा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, भविष्यात आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी शासनाचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या प्रवेश, निवास, समुपदेशन, व्हिसा सहाय्य, सुरक्षा व तक्रार निवारण प्रक्रियेवर प्रभावीपणे देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र अथवा तत्सम विशेष यंत्रणा स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशामुळे स्थानिक विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया अथवा शैक्षणिक संधीवर परिणाम होत नाही.

(३) विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुविधा उपलब्ध आहेत. शासनाच्या निर्देशानुसार तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून आरोग्य केंद्राची सुविधाही उपलब्ध आहे. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण व समन्वय करण्यात येतो.

(४) मुंबई विद्यापीठातर्फे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी एकल खिडकी योजना कार्यान्वित असून या योजनेंतर्गत आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना विविध सुविधा दिल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील आरटीई प्रवेश प्रक्रियेंतर्गत कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्याबाबत

**(४६) * ९६१५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानूर (ता.कळवण, जि.नाशिक) येथे आरटीई (शिक्षण हक्क कायदा) प्रवेशासाठी शाळेपासून १ ते ३ किमी अंतराच्या अटीचे उल्लंघन करून बोगस भाडेकरारनामे तयार करून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून दिल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानूर येथील अवघ्या २३० स्क्वेअर फुटांच्या एका घरात तब्बल चार वेगवेगळ्या पालकांनी कागदोपत्री भाडेकरारनामे दाखवून प्रत्यक्षात ५ ते २० कि.मी. अंतरावर वास्तव्यास असतानाही आरटीई अंतर्गत प्रवेश मिळविल्यामुळे स्थानिक गरजू व पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगस भाडेकरारनाम्यांच्या माध्यमातून १० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत बेकायदा आर्थिक देवाणघेवाण होत असून ग्रामपंचायतीची आवश्यक परवानगी अथवा स्थानिक पडताळणी न करता ही कागदपत्रे तयार करण्यात आलीअसून शिक्षण विभागाच्या पडताळणी समितीने कागदपत्रांची सखोल तपासणी न केल्यामुळे परगावातील अनेक विद्यार्थ्यांना पात्र ठरविण्यात आल्याने शासनाच्या आरटीई नियमांचे उल्लंघन व मूळ प्रवेश प्रक्रियेत गैरप्रकार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने बोगस भाडेकरारनामे तयार करून आरटीई (शिक्षण हक्क कायदा) प्रवेशासाठी शाळेपासून १ ते ३ किमी अंतराच्या अटीचे उल्लंघन करून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून देणाऱ्या संबंधित दोषी घरमालक, पालक आणि संबंधित प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच भविष्यात अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी आरटीई प्रवेशासाठी किमान एक वर्षापूर्वीचा नोंदणीकृत भाडेकरारनामा, प्रत्यक्ष वास्तव्य पडताळणी अनिवार्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) शिक्षण विभागाच्या पडताळणी समितीने बोगस भाडेकरारनाम्याशी संबंधित कागदपत्रांविषयी ग्रामपंचायतीशी संपर्क करून खात्री करून घेतली आहे. तसेच, मानूर, तालुका कळवण येथे संबंधित घरमालक, पालक व इतर लाभार्थी यांच्या वास्तव्याची प्रत्यक्ष तपासणी केलेली आहे. तसेच भाडेकरारनामा नोंदणी प्रत असला तरी पडताळणी केल्याशिवाय प्रवेश देण्यात आलेला नाही. सन २०२६ मधील सर्वच भाडेकरारनामे चुकीचे आढळले असल्याने भाडेकरारनामा आधारित एकही आरटीई अंतर्गत प्रवेश दिलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर येथील चंद्रभागा नदीपात्रात पुरेशा पाण्याअभावी भाविकांची गैरसोय झाल्याबाबत

**(४७) * ८८४० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे मोहिनी एकादशीच्या मुहूर्तावर चंद्रभागा नदीमध्ये स्नान आणि श्री.विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी लाखो वारकरी व भाविक पंढरपूर येथे दाखल झाले असताना चंद्रभागा नदीपात्रात पुरेशा पाण्याअभावी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय झाल्याने वारकरी व भाविकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रभागा नदीच्या पात्रात अत्यल्प पाणी उपलब्ध असल्यामुळे भाविकांना स्वच्छ पाण्याऐवजी दुर्गंधीयुक्त व गुडघाभर पाण्यात स्नान करावे लागल्यामुळे नदीपात्रातील अस्वच्छता, गाळ व दूषित पाण्यामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या दिवशी प्रशासनाकडून आवश्यक जलनियोजन करण्यात आले नाही तसेच स्थानिक नागरिक व वारकरी संघटनांच्या मते गुरसाळे बंधारा व जुना दगडी पूल बंधाऱ्यामधून वेळेत पाणी सोडून चंद्रभागा नदीपात्रात पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे शक्य असतानाही त्याबाबत योग्य समन्वय व नियोजन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर धार्मिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वारकरी संप्रदायाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून लाखो भाविकांच्या मूलभूत सोयींकडे दुर्लक्ष करुन नियोजन करण्यात समन्वयाचा अभाव असल्याने हलगर्जीपणा व निष्काळजीपणा करणाऱ्या व या गैरव्यवस्थेस कारणीभूत असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच भविष्यात आषाढी, कार्तिकी व इतर प्रमुख यात्रांच्या काळात चंद्रभागा नदीपात्रात पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध राहावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत खरे आहे.

यावर्षी अल निनो परिस्थितीचा व हवामान खात्याने दिलेल्या कमी पर्जन्यमानाच्या अंदाजाच्या अनुषंगाने उजनी धरणामध्ये उपलब्ध पाणी साठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. माहे एप्रिल, २०२६ अखेर उजनी धरणामध्ये ९.२४ टीएमसी (१७.२५%) उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता.दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ अखेर पेयजलाचे नियोजन करण्याचे शासन निर्देश असल्याने नदीपात्रात पाणी सोडणे शक्य नव्हते. तसेच मोहिनी एकादशीसाठी पाणी सोडणेबाबत मागणी करण्यात आलेली नाही.

(२) अंशत खरे आहे. भाविकांच्या सोयीसाठी चंदभागा नदीपात्रातील स्वच्छतेच्या अनुषंगाने पंढरपूर नगरपरिषदेमार्फत वेळोवेळी नदीपात्राची (वाळवंट) स्वच्छता करणेत येत असून नदीपात्रातील पाण्याचा DO (Dissolved Oxygen) वाढविणेकामी विकेंद्रीत सांडपाणी प्रक्रिया तंत्रज्ञानाचा वापर करणेचे काम पंढरपूर नगरपरिषदेमार्फत सुरु असून सदरचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(३) अंशत खरे आहे.

मोहिनी एकादशी दिवशी दिनांक २७/०४/२०२६ च्या दैनंदिन पाणी पातळी अहवालानुसार पिराची कुरोली को.प.बंधारा, गुरसाळे को.प.बंधारा व पंढरपुर को.प. बंधारा या बंधाऱ्यांची स्थिती अत्यंत खालावलेली असून या बंधाऱ्यांमध्ये पुढीलप्रमाणे नाममात्र पाणीसाठा उपलब्ध होता.१) पिराची कुरोली को.प.बं.साठा–१६.६० दलघफु (८.०५%)२) गुरसाळे को.प.बं. साठा – १.४५ दलघफु (०.८०%)३) पंढरपूर को.प.बं. साठा – ०.० दलघफु (०.०%) तसेच या बंधाऱ्यावरील पाण्यावर पंढरपूर नगरपालिका, सांगोला नगरपालिका, शिरभावी व इतर ८२ गावांची प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून असल्याने पिण्याच्या पाण्यासाठी राखीव करण्यात आले होते. अशा स्थितीत गुरसाळे बंधारा व जुना दगडी पूल बंधाऱ्यामधून वेळेत पाणी सोडून चंद्रभागा नदीपात्रात पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे शक्य नव्हते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली जिल्ह्यांतील साखर कारखान्यांकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(४८) * ९१९६ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली या चार जिल्ह्यांतील एकूण ३० साखर कारखान्यांपैकी २४ साखर कारखान्यांकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या ऊसाचे सुमारे ४९२ कोटी ६० लाख ११ हजार इतकी देयके मागील तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्याने ऊस उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आला असल्याचे माहे मे,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित साखर कारखान्यांकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ऊस देयके थकविण्याची प्रमुख कारणे काय आहेत, तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मागील तीन महिन्यांपासून प्रलंबित असलेली थकीत देयके तातडीने अदा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील :** (१) नांदेड विभागातील १८ साखर कारखान्यांकडे दिनांक ३१/०५/२०२६ अखेर रुपये २२९८२.०१ लाख एफआरपी देयके प्रलंबित दिसत असली तरी संबंधित कारखान्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यासोबत केलेल्या करारानुसार सदर रक्कमा दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत अदा करणे अपेक्षित आहे.

(२) देयके थकविण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे :-

१) वित्त पुरवठा करणाऱ्या बँकाकडून खेळते भांडवली कर्ज मर्यादा उचल देण्यासाठी विलंब होत असल्याने ऊस देयके अदा करण्यासाठी विलंब होत आहे.

२) कारखान्याने उत्पादित केलेल्या उपपदार्थ पैकी इथेनॉल व मळी विक्री करण्यास व विक्री केलेल्या उपपदार्थांचे रक्कम उपलब्ध होण्यास विलंब होत असल्याने एफ.आर.पी. अदा करण्यास विलंब होत आहे.

३) वैधानिक तरतुदीनुसार परिगणित झालेल्या एफ.आर.पी. दरापेक्षा अधिक दराने ऊस देयके अदा करण्यात येत असल्याने आणि त्याप्रमाणात बँकेकडून वित्तीय सुविधा उपलब्ध होत नसल्याने ऊस देयके अदा करण्यात विलंब होत आहे.

नांदेड प्रादेशिक विभागात ऊस देयके अदा करण्यात विलंब होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विभागातील कारखान्यांना वेळोवेळी नोटीस देवून ऊस (नियंत्रण) आदेश, १९६६ मधील ३(३) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबत प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड व या कार्यालयाच्या स्तरावर वेळोवेळी सुनावण्या घेण्यात आल्या असून थकीत ऊसबीलाची रक्कम तात्काळ अदा करणेबाबत कारखान्यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

तथापि, ऊस पुरवठादारांसोबत करार केलेले असल्यामुळे शेतकऱ्यांना पहिला हप्ता करारानुसार व उर्वरीत दोन हप्ते बैलपोळा सणापूर्वी व दिपावलीपूर्वी देण्याचे निश्चित केले असल्याने एफ.आर.पी. थकबाकी दिसत आहे. तथापी, सर्व ऊस पुरवठादारांसोबत करार केलेले असल्याने नियमानुसार एफ.आर.पी. थकबाकी नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पाची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४९) * ९१५८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा नदीवरील सुरेवाडा उपसा सिंचन योजनेला सन २००८ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळूनही सुमारे दोन दशकांनंतर प्रकल्पाची किंमत ६८.९८ कोटीं रुपयांवरून ५०० कोटीं रुपयांवर पोहोचली असून गेल्या १० वर्षांत केवळ सुमारे २५० कोटी रुपयांची कामे पूर्ण झाली व उर्वरित सुमारे ३०० कोटी रुपयांची कामे अद्याप अपूर्ण असल्याची माहिती माहे एप्रिल, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोका वन्यजीव अभयारण्य व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाशी संबंधित आवश्यक पर्यावरणीय/वन परवानग्या न मिळणे, कामांच्या निविदा/वाटप प्रक्रियेत झालेला विलंब, तसेच ठेकेदारांकडून अनुभव प्रमाणपत्र न देणे इत्यादी कारणांमुळे प्रकल्प रखडला असून त्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विलंबामुळे तालुक्यातील २८ गावांतील ७,०५० हेक्टर क्षेत्र अद्याप सिंचनाखाली येण्यापासून वंचित असून, मुख्य कालवा व पाइपलाईनची कामे अपूर्ण असल्याने शेतकऱ्यांना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुरेवाडा उपसा सिंचन प्रकल्पाची कामे निर्धारित वेळेत पूर्ण न होण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सदर कामे वेळेत पूर्ण न करणाऱ्या अधिकारी/ठेकेदारांवर कोणती कारवाई केली तसेच सदर कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे,

सुरेवाडा उपसा सिंचन योजनेस मूळ प्रशासकीय मान्यता दिनांक २९/११/२००६ रोजी मिळाली आहे. प्रकल्पाची अद्ययावत मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत ५६८ कोटी असून मे, २०२६ अखेर रुपये २८०.१३ कोटी खर्च झाला आहे.

(२) हे खरे नाही,

सदर प्रकल्पास पर्यावरण मान्यता दिनांक २१/०१/२०१६ रोजी मिळालेली आहे. वन्यजमीन मान्यता दिनांक ०८/११/२०१८ रोजी मिळालेली आहे. तथापि, वनपरिक्षेत्रातुन जाणाऱ्या उर्ध्वनलिकेच्या कामामध्ये ६५० मी. लांबीतील झाडांची संख्या वाढल्यामुळे सदर झाडांची कटाई करण्याबाबत मंजुरीसाठी शासनास (महसूल व वनविभाग) सादर करण्यात आला असून कार्यवाहीत आहे. प्रकल्पावरील निविदा प्रक्रीया नियमानुसार झालेली असून त्यामुळे शासकीय निधीचा अपव्यय झालेला नाही.

(३) अंशत: खरे आहे.

मुख्य कालव्याचे काम ७०% पूर्ण झालेले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहेत. तसेच वितरण प्रणालीची कामे सुरू आहेत. तथापि, मुद्दा क्र.२ मध्ये नमुद केल्यानुसार उर्ध्वनलिकेची ६५० मी. ची कामे प्रलंबित आहेत. वरीलप्रमाणे झाडांची कटाई करण्याच्या कामास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर उर्ध्वनलिकेची उर्वरीत कामे करून लगेच शेतकऱ्यांना लाभ देण्याचे नियोजित आहे.

(४) सदर योजनेची कामे प्रगतीपथावर असून नियोजनानुसार जुन, २०२९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकण विभागातील कमी पटसंख्या असलेल्या व शून्य शिक्षक संख्या मंजूर झालेल्या शाळांचे अस्तित्व कायम ठेवणेबाबत

**(५०) * ९०६० श्री.जगन्नाथ अभ्यंकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबईतील सुमारे १०० माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थी अस्तित्वात असूनही शिक्षक पदांना मान्यता नाकारण्यात आली असल्याने संचमान्यतेमध्ये शून्य शिक्षक संख्या दर्शविण्यात आलेल्या शाळांपैकी बहुसंख्य शाळा मराठी माध्यमाच्या असून काही शाळा गुजराती, हिंदी व इतर मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या असल्याचे माहे एप्रिल,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक मंजुरीचे विद्यमान निकष कठोरपणे लागू केल्यास मुंबईसह राज्यातील अनेक मराठी माध्यम व मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा बंद पडण्याची शक्यता निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त ठरतील व विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण घेण्याची सुविधा भविष्यात उपलब्ध राहणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पटसंख्या कमी असल्याच्या कारणावरून शाळांचे समायोजन अथवा शाळा बंद करण्याच्या धोरणामुळे राज्यातील सुमारे चार हजार गावे व पाडे येथे घराजवळ शाळा उपलब्ध नसल्याने जवळपास २४ हजार विद्यार्थ्यांना अन्य गावांतील शाळांमध्ये प्राथमिक शिक्षणासाठी १० ते २० किलोमीटरपर्यंत प्रवास करावा लागत असल्याने दुर्गम व डोंगराळ भागातील शाळांसाठी विद्यार्थी संख्येचे निकष शिथिल करण्याबाबत मा.शिक्षणमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली, मा.उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री, मा.मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री आणि कोकण विभागातील लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली असून, सदर बैठकीत त्यांनी कोकण विभागासह राज्यातील दुर्गम भागातील मराठी माध्यमाच्या शाळा टिकाव्यात याकरीता इयत्ता नववी व दहावीच्या शिक्षक पदांसाठी प्रत्येक वर्गात किमान १० विद्यार्थी असावेत, असा निकष मान्य करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोकण विभागासह दुर्गम व डोंगराळ भागातील तसेच मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी शेवटच्या वर्गाच्या पटसंख्येचा निकष शिथिल करणे, इयत्ता नववी-दहावीकरीता किमान १० विद्यार्थी निकष लागू करणे, तसेच सन २०२४-२५ मध्ये मंजूर असलेली शिक्षक पदे कायम ठेवणे व संचमान्यतेत शून्य शिक्षक संख्या दर्शविण्यात आलेल्या शाळांचे पुनर्मुल्यांकन करणे तसेच शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ नुसार विद्यार्थ्यांच्या घरापासून प्राथमिक शाळा १ किलोमीटर व माध्यमिक शाळा ५ किलोमीटरच्या परिघात उपलब्ध राहतील यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. संचमान्यतेबाबतच्या किमान विद्यार्थी संख्येच्या निकषांनुसार मुंबई विभागामधील एकूण ५९ माध्यमिक शाळांमध्ये शून्य शिक्षक पदे मंजूर झाली आहेत.
(३) व (४) शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ मधील तरतुदीनुसार ज्या माध्यमिक शाळांमध्ये गट ९-१० करीता शिक्षक अनुज्ञेय होतात अशा शाळेपासून ३-५ किलोमीटर परिसरात असणाऱ्या व त्या परिसरात माध्यमिक शाळांत इ.९ ते १० वीच्या गटाकरीता ० पदे मंजूर होणाऱ्या शाळांमध्ये इ. ९-१० वी च्या गटामध्ये संचमान्यता वर्ष २०२५-२६ मध्ये दोन्ही वर्गाची एकत्रित पटसंख्या ४० असल्यास ३ शिक्षक अनुज्ञेय करण्याबाबत शासन पत्र दिनांक २४/०३/२०२६ अन्वये निर्देश देण्यात आले होते. तथापि, शासन पत्र दिनांक ११/०५/२०२६ अन्वये सदरहू दिनांक २४/०३/२०२६ च्या निर्देशांमध्ये बदल करुन शासन निर्णय दिनांक १५/०३/२०२४ मधील निकषांच्या अनुषंगाने इयत्ता ९-१० वीच्या ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये म्हणून वर्ष २०२५-२६ ची संचमान्यता करताना दोन्ही वर्गांची एकत्रित पटसंख्या २० किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास ३ शिक्षक अनुज्ञेय करण्याची सवलत देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शैक्षणिक अनुदान वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणून गैरव्यवहारास प्रतिबंध करण्याबाबत

**(५१) * ९११२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाच्या अनुदानातून सुमारे सव्वा कोटी रुपयांची अफरातफर केल्याप्रकरणी अलिबाग येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ तसेच खोपोली शिक्षण प्रशासक मंडळाशी संबंधित प्राचार्य, शिक्षक, सहशिक्षक व इतर अशा एकूण २२ व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत वाशी (नवी मुंबई) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून माहे ऑगस्ट, २०१८ पासून सातत्याने लूट सुरू असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोषण आहार वितरण, अनुदानित व विनाअनुदानित शाळांची माहिती, पटसंख्या, विद्यार्थी नोंदी तसेच शैक्षणिक अनुदान वितरणाशी संबंधित विविध विभागांमध्ये बनावट कागदपत्रे व खोटी माहिती सादर करून सदर गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने बनावट कागदपत्रांच्या आधारे अनुदानात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी प्राचार्य, शिक्षक, शिक्षण संस्थाचालक तसेच संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

संबंधित शिक्षण मंडळाच्या तत्कालिन अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक/प्राचार्य, संबंधित कर्मचारी व बनावट आदेश तयार करण्यास मदत करणाऱ्या १९ व्यक्तींविरुध्द वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

विभागीय अध्यक्ष, शिक्षण मंडळ मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार संबंधित कर्मचाऱ्यांचे मान्यता आदेश रद्द करून संबंधित शिक्षण मंडळाच्या तत्कालिन अध्यक्ष, सचिव, मुख्याध्यापक/प्राचार्य, संबंधित कर्मचारी व बनावट आदेश तयार करण्यास मदत करणाऱ्या व्यक्तींविरुध्द वाशी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.